| ५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी ३०३, महाराजा अपार्टमेन्ट, अमन टॉकीज रोड, उल्हासनगर–२. **राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी** | इयत्ता ११ वाणिज्य | बहुजन विकास शिक्षण प्रसारक मंडळ, नालंदा शाळेच्या पाठीमागे, दहा चाळ, उल्हासनगर–४. | **उपाध्यक्ष** दि. १५.०५. २००६ ते आजपर्यंत | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, उल्हासनगर शहर जिल्हा अध्यक्षांचे शिफारस पत्र, शाळा सोडल्याचा दाखला, मतदार यादीचा पृष्ठ, प्रतिज्ञापत्र, धर्मादाय आयुक्त यांचेकडे अधिनियम १९६० अन्वये नोंदणी केलेले प्रमाणपत्र व अधिनियम १९५० अन्वये नोदंणी केलेले प्रमाणपत्र, संस्थेचे शिफारस पत्र, संस्थेचा ठराव, अनुसुची बारा अनुसार कामाचे प्रमाणपत्र, २००४ ते २०१० लेखा परिक्षण अहवाल, | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे, आणि राष्ट्रवादी गटनेता कडून अधिकृत उमेदवार असल्याने शिफारस पत्र प्राप्त आहे. |
| ६ | श्री. हरदास सन्मुखदास माखिजा ५०२, हिरापन्ना अर्पाटमेंन्ट, गोल मैदान उल्हासनगर–१. **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस** | इन्टर आर्टस (बी.ए.) | आदर्श शिक्षण समिती, कैलास कॉलनी, उल्हासनगर–५. | **अध्यक्ष**, जानेवारी १९९५ ते ऑक्टोंबर २०११. | संस्थेचे शिफारस पत्र, बोनाफाईड सर्टीफीकेट, संस्थेचा ठराव, प्रतिज्ञापत्र, २००६.०७, ०७. ०८, ०८–०९, ०९–१०, जमाखर्चाचा अहवाल, | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ७ | श्री. राजु (जीवन) चद्रंभान इदनानी सिमरन पार्क, प्लॅट नं. ६०१, सिटी टॉवरच्या मागे, उल्हासनगर–३. **सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया** | इ. १२ वी उत्तीर्ण | ब्राम्हणपाडा एज्युकेशन सोसायटी, ब्राम्हणपाडा, शिवकॉलनी, शांतीनगर, उल्हासनगर–३. | **उपाध्यक्ष**, ऑगस्ट २००६ ते आजपर्यंत | प्रतिज्ञापत्र, शाळा सोडल्याचा दाखला, १२ वी ची गुणप्रत्रिका, संस्थेचे शिफारस पत्र, संस्थेचा ठराव, धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणी प्रमाणपत्र, मार्च ०९–मार्च व मार्च ११ चा लेखा परिक्षण अहवाल, | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ८ | श्री. प्रदीप अर्जुनदास रामचंदानी जी/१, पुजा अर्पाटमेंन्ट, उल्हासनगर–३. **भारतीय जनता पार्टी** | बी.कॉम. | रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर (पू), | **अध्यक्ष, संचालक व सभापती,** दिनांक १.१२. १९९२ ते २०१२ | प्रतिज्ञापत्र, मतदार यादीचे पृष्ठ, शिफारस पत्र, संस्थेचा ठराव, २००८–०९, ०९–१०, १०–११ चा लेखापरिक्षणाचा अहवाल, बी.कॉम चे प्रमाणपत्र | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | श्री. शकंर गोविंदराम लुंड<br>सी ब्लॉक, ६२८/१२५६, नेताजी रोड, उल्हासनगर–४.<br>**शिवसेना** | एस.एस.सी पास | अनिल मार्टियल आर्ट चारिटेबल ट्रस्ट, ४०५, सागर अर्पाटमेन्ट, साधु वासववानी, पुतळयासमोर, उल्हासनगर–१. | **अध्यक्ष**, दि. १५.६.०६ ते १५.६.१२ | शाळा सोडल्याचा दाखला, प्रतिज्ञापत्र, संस्थेचा ठराव, धर्मादाय आयुक्तांकडे संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मार्च ०८ मार्च ०९ व मार्च १० चा उत्पन्न खर्चाचा अहवाल. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| १० | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी<br>श्रीकृष्णा कॉटेज, प्लॉट नं. ७२९, ७३०, गुजराथी शाळेमागे, उल्हासनगर–१.<br>**भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस** | इ. ११ वी | साईबाबा एज्युकेशनल ट्रस्ट, बॅ.नं. १०९७ समोर, साईभवन, ओटी सेक्शन, उल्हासनगर–३. | **सह सचिव**, दि. २००५ ते २०१२ | मतदार यादीचे पृष्ठ, प्रतिज्ञापत्र, संस्थेचा ठराव, इ. ११ वी चे प्रमाणपत्र, मार्च ०९ ते मार्च १०, मार्च ११ लेखा परिक्षण अहवाल | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ११ | डॉ. गुंल हुदंराज भाटीया<br>१०२, शालुपॅलेस, रिजन्सी हॉटेल शेजारी, उल्हासनगर–२.<br>**शिवसेना** | बी.ए.एम.एस, मुबंई विद्यापिठ | | **वैद्यक व्यवसायी** म्हणुन प्रमाणपत्र मिळाल्याचा दिं. जुन १९७९ पासुन | बी.ए.एम.एस. चे प्रमाणपत्र, गुणप्रत्रिका, प्रतिज्ञापत्र. | नियम ४ मधील क ते छ मधील अर्हता असण्याऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीची पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करण्या प्रयोजनार्थ नियम ४ क प्रमाणे पात्र. |
| १२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड<br>ब्लॉक सी ६२८/१२५५, नेताजी रोड, दिपक दरबार जवळ, उल्हासनगर–४.<br>**भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस** | — | पुज्य पचांयत, दिपक दरबार, व मंदीर, नेताजी रोड, उल्हासनगर–४. | **उपाध्यक्ष**, दिनांक १५.०६.२००५ ते आजपर्यंत | संस्थेचा ठराव, प्रतिज्ञापत्र, धर्मादाय आयुक्तांकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मार्च २००८ ते मार्च ०९, मार्च २०१०–११ चा लेखा परिक्षण अहवाल. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| १३ | श्री. भानजी भिकारी मोरे<br>डॉ. आबेंडकरनगर, चोपडा कोर्टाजवळ, उल्हासनगर–३.<br>**शिवसेना** | जुनी ११ वी | अक्षय शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था, इगतपुरी, नाशिक. | **उपाध्यक्ष**, दि २५.८.१९९९ ते २.४.२०१२ | शाळा सोडल्याचा दाखला, मतदार यादीचे पृष्ठ, नगरसेवक म्हणुन निवडून आल्याचे प्रमाणपत्र, इ. ११ वी चे प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे, उमेदवार ज्या संस्थेचा पदाधिकारी आहे ती संस्था कार्यरत असुन नाशिक जिल्हयामध्ये नोदंणीकृत आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संस्थेचे शिफारस पत्र, संस्थेचा ठराव. मार्च २००८–०९ ते २०१०–११ चे लेखा परिक्षणाचा अहवाल. | म्हणुन महापालिका क्षेत्रात कार्यरत नाही. सदरहु संस्थेचे सलग ३ वर्षाचे एकूण वार्षिक उप्तन्न व खर्च रु. २५,०००/– च्या पूढे नाही त्यामुळे भारतीय संविधनाच्या अनुसूची १२ मध्ये महानगरपालिकेची जी कामे दर्शविली आहेत त्यांच्याशी संबंधित कार्यक्रम कामी २५,०००/– चा एक प्रकल्प सदस्यांच्या नामनिर्देशनाच्या आधीच्या ३ वर्षात पूर्ण केल्याचे प्रमाण दिसून येत नाही. |
| **१४** | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत<br>मेराघर अर्पाटमेन्ट, २०४, दुसरा माळा, मराठा सेक्शन, उल्हासनगर–४.<br>**शिवसेना** | एस.एस.सी | ज्ञानदा वाचनालय, उल्हासनगर–४. | **अध्यक्ष**, दि. २५.१२.२००१ ते २४.१२.२००६ तसेच दि.२६.१.२००८ ते आजपर्यंत | संस्थेचा ठराव, पत्र, प्रतिज्ञापत्र, शाळा सोडल्याचा दाखला, धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मतदार यादीचे पृ्ष्ठ, मार्च २००७, मार्च २००९, मार्च २०१० चे लेखा परिक्षण अहवाल. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे, त्यामध्ये श्री. रविंद्र नामनारायण ओझा या नांवाच्या उमेदवारांने हरकत घेतली आहे की वाचनालयाची नोंदणीकृत संस्था नियम ४ (छ) मध्ये पात्र ठरविता येणार नाही. नियम ४ (छ) अनुषंगाने संबंधित संस्थेचे मुंबई सार्वजनिक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत आहे. |
| **१५** | श्री. रविंद्र रामनारायण ओझा महाराष्ट्र मित्र मंडळा शेजारी, उल्हासनगर–१. **शिवसेना** | जुनी ११ वी | महाराष्ट्र मित्र मंडळ, उल्हासनगर–१. | **सचिव**, दि. १.०४. १९९२ ते ३१.३.२०१३ | मतदार यादीतील पृष्ठ, प्रतिज्ञापत्र, संस्थेचा ठराव, मार्च २००९ मार्च २०१०, मार्च २०११ चा लेखा परिक्षण अहवाल, धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे अर्जदाराने कोणत्या कालावधी साठी पदधारण केले आहे त्याचा उल्लेख विहित नमुन्यातील ठरावात दिसुन येत नाही, परंतु वेगळया प्रमाणपत्राव्दारे ते स्पष्ट केले आहे. |

नियम ४ (छ) मधील अर्हतेसाठी अर्जदाराने किंवा संस्थेने प्रस्तुत केलेल्या सर्व कागदपत्रांची चौकशी केल्याशिवाय प्रथम दर्शनी बरोबर आहे. त्यात जर कोणत्याही प्रकारची फसवणुक किंवा दोष असल्याचे आढळुन आल्यास त्यासाठी संबंधीत संस्था व उमेदवार जबाबदार राहील असे उमेदवारांकडुन व्यक्तीगत प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्यां) नियम २०१२ मधील नियम ४ मधील क ते छ मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीचे पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतु प्राप्त झालेल्या अर्जावरील नियम ४ (क) मधील अर्हतेसाठी एकच अर्ज प्राप्त झाला आहे, तसेच नियम ४ (ड) अर्हतेसाठी एकच अर्ज प्राप्त झाला आहे, आणि राहिलेले १३ अर्ज नियम ४ (छ) मधील अर्हतेसाठी प्राप्त झाले आहेत.

अनुक्रमांक २ मधील उमेदवार ॲड. अनिल आयलानी हे नियम ४ (ड) प्रमाणे पात्र आहेत. परंतु पक्षाच्या समंतीशिवाय त्यांचे नामनिर्देशन करता येणार नाही. आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे गटनेत्याच्या पत्रानुसार त्या पक्षाचे अधिकृत उमेदवार श्री. मनोज सयानी हे असल्याचे दिसते, म्हणुन दुसरा पर्याय उपलब्ध नाही, तसेच नियम ४ (छ) प्रमाणे सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया व भाजपा कडुन एकेक एक उमेदवार असुन दुसरा पर्याय नसल्याने त्यांचे नामनिर्देशन करणे टाळता येणार नाही म्हणुन अनुक्रमांक ७ वरील उमेदवार श्री. राजु (जीवन) इदनानी व अनुक्रमांक ८ वरील उमेदवार श्री. प्रदिप रामचदांनी यांचे नामनिर्देशन टाळता येणार नाही. तसेच अनुक्रमांक ११ वरील उमेदवार डॉ. गुल भाटीया हे नियम ४ (क) प्रमाणे पात्र असुन जर शिवसेना पक्षाने त्यांना अधिकृत उमेदवार ठरविला तर त्याप्रमाणे शिफारस करता येईल. अनुक्रमांक ६ वरील उमेदवार श्री. हरदास माखिजा याना अडीच वर्षाचा महापौर पदाचा अनुभव असुन त्यांना नियम ४ (छ) च्या अर्हते व्यतीरिक्त प्राधान्य देण्यासारखे आहे, जर उमेदवार पक्षातर्फे अधिकृत ठरल्यास त्यांची शिफारस करणे योग्य वाटते.

म्हणुन प्रत्येक अर्हतेसाठी एक पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करता येणार नाही, तरीदेखील अनुक्रमांक ५,६,७,८ व ११ वरील उमेदवारांचे नावाच्या शिफारसीचा विचार करुन पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी प्रस्तावित.

परंतु शिफारस केलेल्या व्यक्तींची शिफारस महापालिकेने अमान्य करण्याचे ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.

**विशेष महासभा ठराव क्रः—** २ **दिनांक : ०९/०४/२०१२**

सुचकाचे नावः— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नावः— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत प्रत्येक उमेदवारासमोर आयुक्तांनी दर्शविलेला शेरा व नामनिर्देशित सदस्य पदासाठी ५ व्यक्तींची शिफारस विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील नियम ४ (छ) च्या अर्हतेसाठी व्याख्यीकरण व स्पष्टीकरणाच्या कमतरतांमुळे व पक्षीय बलाबलानुसार अनाधिकृत अर्जदारांचा विचार न करता विविध पक्षातील खालील ५ उमेदवारांचे नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन करण्यास मान्यता देत आहे.

१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी

२. श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी

३. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

४. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी

५. श्री. बी. बी. मोरे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४:—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे.

---

**महापालिका सचिवः—** येथे पक्षनिहाय जी नावे देण्यात आली आहेत ती नावे मी वाचुन दाखवितो.
कॉंग्रेसच्यावतीने श्रीमती जया साधवानी, श्री. गोदुमल क्रिशनानी
साई पक्षाच्यावतीने श्री. अकुंश म्हस्के, डॉ. महेश गावडे
आरपीआयच्यावतीने श्रीमती पचंशीला नाना पवार
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने श्रीमती ज्योती कालानी, श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता, श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) ठाकुर, श्री. राजु रामसिंग कंडारे
शिवसेनाच्यावतीने श्री. रमेश चव्हाण, श्री. सुरेश जाधव, श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती नेहा भोईर
भाजपाच्यावतीने श्री. राम (चार्ली) पारवानी, श्रीमती मिना कुमार आयलानी, कु. जयश्री जीवनलाल जग्यासी

ठिक आहे? सर्व समंतीने मान्य? ठिक आहे?

**महापौरः—** या विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.. .

---

☑ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे.

**प्रस्तावनाः—**

सन—२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. दिनांक १७/२/२०१२ निवडणूक निकालानंतर व दिनांक २०/२/२०१२ रोजी अधिसुचनाव्झारे निवडून आलेल्या सदस्याचे नाव जाहिर केल्यावर आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३१ अ च्या तरतुदी अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्या प्रयोजनार्थ मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन येथे फ्रट किंवा आघाडीची नोंदणी झाल्यावर पक्षनिहाय संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | पाठींबा दिल्याने संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | पाठींब्यानतंर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २० | ० | — | २० |
| शिवसेना | १९ | ० | — | १९ |
| भाजपा | ११ | ० | — | ११ |
| कॉंग्रेस | ८ | ० | — | ८ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ७ | **+३** | — | १० |
| आर.पी.आय(आठवले गट) | ४ | ० | — | ४ |
| बहुजन समाज पार्टी | २ | **—२** | — | ०० |
| अपक्ष | ०१ | ०१ | — | ०० |
| मनसे | ०१ | **००** | — | ०१ |
| अपक्ष | ०१<br>०१<br>०१<br>०१ | **००**<br>**००**<br>**००**<br>**००** | —<br>—<br>—<br>— | ०१<br>०१<br>०१<br>०१ |
| एकूण | ७८ | | | ७८ |

महापालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स आफ इंडिया गट | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | १९ | ११ | १० | ८ | ४ | १ | ५ |

| | |
|---|---|
| ७८<br>१६ | = ४.८७ |

स्थायी समितीच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ४.८७ असणे आवश्यक आहे.

त्याअनु   ंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | रा.का.पा. | २०<br>—— X १६<br>७८ | = ४.१० | (७) | मनसे | १<br>—— X १६<br>७८ | = ०.२० |
| (२) | शिवसेना | १९<br>—— X १६<br>७८ | = ३.८९ | (८) | अपक्ष | १<br>—— X ०५<br>७८ | = ०.०६ |
| (३) | भाजपा | ११<br>—— X १६<br>७८ | = २.२५ | (९) | अपक्ष | १<br>—— X ०५<br>७८ | = ०.०६ |
| (४) | साई | १०<br>—— X १६<br>७८ | = २.०५ | (१०) | अपक्ष | १<br>—— X ०५<br>७८ | = ०.०६ |
| (५) | कॉंग्रेस | ८<br>—— X १६<br>७८ | = १.६४ | (११) | अपक्ष | १<br>—— X ०५<br>७८ | = ०.०६ |
| (६) | आरपीआय | ४<br>—— X १६<br>७८ | = ०.८२ | (१२) | अपक्ष | १<br>—— X ०५<br>७८ | = ०.०६ |

वरील गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | साई | कॉंग्रेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ३ | २ | २ | १ | १२ |

यानंतर रिक्त राहणाऱ्या **चार** जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. आणि खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ पुढील प्रमाणे आहे.

**(१) शिवसेना** ०.८९ **(२) आर.पी.आय** ०.८२ **(३) कॉंग्रेस** ०.६४
**(४) रा.का.पा.** ०.१० **(५) भा.ज.पा.** ०.२५ **(६) अपक्ष** ०.२०
**(७) साई** ०.०५ **(८) जनविकास आघाडी** ०.०२

वरील परिस्थिती पहाता शिवसेना, आरपीआय, कॉंग्रेस व भा.ज.पा. या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे **चार रिक्त** जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे स्थायी समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| रा.का.पा. | शिवसेना | भाजपा | साई | कॉंग्रेस | आरपीआय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | २ | २ | १ | १६ |

<u>विशेष महासभा ठराव क्र.:— ३</u> <u>दिनांक :— ०९/०४/२०१२</u>

सुचकाचे नाव:— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव:— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील सोळा सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करीत आहे.

१. श्री. रमेश चव्हाण

२. श्री. सुरेश जाधव

३. सौ. ज्योती गायकवाड

४. सौ. नेहा भोईर

५. श्री. राम (चार्ली) पारवानी

६. सौ. मिना कुमार आयलानी

७. कु. जयश्री जीवनलाल जग्यासी

८. श्री. अकुंश म्हस्के

९. डॉ. महेश गावडे

१०.सौ. पचंशीला नाना पवार

११.सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

१२.सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता

१३.श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर

१४.श्री. राजू रामसिंग कंडारे

१५.सौ. जया मोहन साधवनी

१६.श्री. गोदुमल किशनानी

इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहू ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते मंजुर**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**विशेष महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**सदस्य श्री. राजु जग्यासी:—** मा. महापौरजी, ज्या ५ व्यक्तींची नामनिर्देशित सदस्य म्हणुन निवड करण्यात आली आहे त्यांना सभागृहात बोलाविण्यात यावे.

**महापालिका सचिव:—** ज्या ५ उमेदवारांची नामनिर्देशित सदस्य म्हणुन घोषणा करण्यात आली आहे त्यांनी कृपया सभागृहात यावे. ते ५ सदस्य आहेत.

१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी

२. श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी

३. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

४. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी

५. श्री. बी. बी. मोरे

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** श्री. मोरे साहेब, मागच्या दाराने या, लाजु नका.
कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.१७ वाजता महापौर श्रीमती आशा जीवन इदनानी यांनी सभा सपल्याचे जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–१९/५
/२०१२

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/५/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/५/२०१२ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशा जीवन इदनानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती आशा जीवन इदनानी –– महापौर

२. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ४१ | श्रीम. खान इसरद सऊद |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४२ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ४३ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ४४ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४५ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४६ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४७ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४८ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ११ | श्री. जाफरअली चौधरी | ४९ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ५० | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १३ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ५१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्रीम. अनिता संतोष तरे | ५२ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १५ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५४ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १७ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ५५ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १८ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ५६ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ५७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २० | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५८ | श्रीम. पिंकी मुरलीधर उदासी |
| २१ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५९ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २२ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ६० | श्रीम. दिप्ती नवीन दुधानी |
| २३ | श्रीम. भागीबाई हारीसींग लबाना | ६१ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ६२ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ६३ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २६ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ६४ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २७ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ६५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ६६ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्री. गणपत गोविंद एडके | ६७ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| ३० | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ६८ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६९ | श्रीम. माया हरेश चावला |
| ३२ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ७० | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| ३३ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ७१ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ३४ | श्री सुरेश पप्पू बूधरमल कालानी | ७२ | श्रीम. अपेक्षा विकास पाटील |
| ३५ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ७३ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३६ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ७४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३७ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ७५ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| ३८ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ७६ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ७७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ४० | श्रीम. पंचशीला नाना पवार | ७८ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. डॉ. महेश गजानन गावडे, ३. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, ४. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ५. श्रीम. कमला गोदुमल किशनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१. श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
२. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री.राजेंद्र चौव्हान, उप–आयुक्त
५. श्री. प्रल्हाद होगेपाटील,नगररचनाकार
६. श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक, नगररचना
७. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
९. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण
११. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
१२. श्री. रमेश काजळे, उप कर निर्धारक व संकलक
१३. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१४. श्री. एस.एम. अली, उप अभियंता, पाणी पुरवठा
१५. श्री. पारेख, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
१६. श्री. सिंघानी, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१७. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
१८. श्री. शिवकुमार सारस्वत, प्र.प्रभाग अधिकारी
१९. सौ. प्राजक्ता कुलकणी, प्र. जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

वंदे मातरम म्हणुन सायंकाळी ४.०८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>**सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब, दिनांक २४ एप्रिल, २०१२ रोजी नागरीक सुविधा केंद्र प्रमुख श्री. अभिजित महामुलकर यांचे अपघाती निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली दिली जावी.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती जया माखिजा, श्रीमती निना नाथानी, श्रीमती पंचशिला पवार, सदस्य श्री. राजेश वधारिया, श्री. अनु मनवानी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला. 

**<u>महापालिका सचिव:–</u>**श्री. धनंजय बोडारे व श्री. सुभाष मनसुलकर यांचाही हाच प्रस्ताव आहे.
विषय क्र. १ प्रश्नोत्तरे..................

**<u>सदस्य श्री. विजय सुपाळे :–</u>**माझी नगरसेवक श्री. मधुकर दोंदे यांचे दिनांक २५/४/२०१२ रोजी निधन झाले आहे त्यांना सुध्दा श्रध्दांजली दिली जावी.

**महापालिका सचिव:—**कृपया मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरीक सुविधा केंद्राचे प्रमुख तथा प्रोग्रामर श्री. अभिजित महामुलकर यांचा दिनांक २४/४/२०१२ रोजी अपघातामध्ये हृदयद्रावक दुर्देवी मृत्यु झाला. महानगरपालिकेच्या सर्व विभागांचा इत्थंभुत लेखाजोखा, जन्म—मृत्यु, विवाह दाखले इत्यादी कामकाजाचे संगणकीकरण करणे, नागरीक सुविधा केद्र स्थापन करणेपासुन ते व्यवस्थीतरित्या चालवुन शहरातील नागरीकांना नागरीक सुविधा केंद्राचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा देणेसाठी या संगणक तज्ञाने दैनंदिन १४ ते १८ तास निष्कामतेने कठोर परिश्रम घेतले होते. त्यांचा मृत्यु/शेवटही महापालिकेचे कर्तव्य पार पाडत असतांना महापालिकेच्या कामासाठी झाला आहे. त्यांना महासभेत भावपुर्ण श्रध्दांजली वाहण्यासाठी प्रस्तावित.

माजी नगरसेवक श्री. मधुकर दोंदे यांचे दिनांक २५/४/२०१२ रोजी निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४ अ**

**दिनांक:—१९/५/२०१२**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अभिजित महामुलकर, श्री. मधुकर दोंदे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्या श्रीमती सोनिया जग्यासी, श्रीमती निना नाथानी, सदस्य श्री. सुरेश जाधव, श्री. राजेश वदारिया, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—**मा. महापौरजी, श्री. अभिजित महामुलकर यांचे रस्ता अपघातात निधन झाले. त्यादिवशी ते कोठे जात होते? याची कल्पना सभागृहाला देण्यात यावी. ते कुणाकडे जात होते? का जात होते? आयुक्त साहेब सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत महापालिकेत उपस्थित असतांनाही त्यानंतर कोणती तरी संचिका घेवुन ते आयुक्तांच्या घरी जात होते. अशा प्रकारच्या बातम्या आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचल्या आहेत. याबाबतची हकीकत काय होती? ते कोठे जात होते? काही कारण

नसतांना एका कर्मचा—याचे निधन झाले आहे. त्यास जबाबदार कोण? त्यादिवशी ते कोठे जात होते याची सभागृहातील सर्व सदस्यांना माहिती मिळाली पाहिजे. व मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की ते आपणाकडे येत होते का? जसे या संदर्भातील बातम्या वर्तमानपत्रामध्ये एक सारख्या छापुन येत होत्या. तर काय ते आपणाकडे येत होते काय? मा. महापौरजी, हे विचारण्याचे मागे एक कारण असे आहे की, त्यांच्या मागे फक्त त्यांची आई व वडिल आहेत. त्यांचे वय ३२ वर्षाचे होते व लग्न झाले नव्हते. ३२ वर्षाच्या वयातच ते आपले प्राण गमावुन बसले. त्यांच्या अपघाताचे, मृत्युचे कारण कोण? त्यास जबाबदार कोण? जोपर्यंत सभागृहास याची माहिती मिळत नाही तोपर्यंत सभेचे पुढील कामकाज चालु देणार नाही. मा. महापौर महोदया, याची माहिती देण्यासाठी आपण आयुक्तांना सांगा.

यावेळी सदस्य श्री. राजेश वदारिया यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**सन्माननिय सभागृहास मी सांगु इच्छितो की, आमचे लोकनेते सन्माननिय श्री. पप्पु कलानीजी सभेत येत आहेत. मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सर्व सदस्यांना विनंती करतो की, टाळयांच्या गजरात त्यांचे स्वागत केले जावे.

यावेळी सदस्य श्री. पप्पु कालानी, सदस्या श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सदस्यांनी बाके वाजवुन त्यांचे स्वागत केले. तसेच श्री. पप्पु कलानी यांनी महासभा हजेरीपटावर स्वाक्षरी करुन ते सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—</u>**मा. महापौरजी, कृपया आयुक्त साहेबांना माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यास सांगा.सभागृहातील प्रत्येक व्यक्तीस याबाबतची माहिती असली पाहिजे की असे काय कारण होते की, कार्यालय सुटल्यानंतर त्यांना आयुक्तांनी आपल्या घरी बोलाविणे, त्यांच्याबरोबर ठेकेदाराने जाणे, संगणक पुरवठा करणारा ठेकेदार त्यांच्याबरोबर जाणे आणि काही रक्कम तेथे पोलिसांना प्राप्त होणे. गाडीचा अपघात झाल्यानंतर, दुखापत ग्रस्त एक व्यक्ती अजुनही रुग्णालयात पडुन आहे.

यावेळी सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. सुरेश जाधव यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**आमचे मित्र नगरसेवक श्री. सुभाष मनसुलकर यांनी जो एक मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्यावर प्रकाशझोत टाकला जावा. पत्रकारांकडुन आम्हांला ही सुध्दा माहिती मिळाली आहे की, श्री. अभिजित महामुलकर हे जे वाहन घेवुन जात होते त्यात काही अतिसंवेदनशील कागदपत्रही मिळाली होती. काही फ्लॉपी सुध्दा मिळाल्या होत्या. महानगरपालिकेचे काही अभिलेख मिळाले होते. व त्याचबरोबर लाखो रुपयाची रोकड मिळाली होती. काय याची सभागृहाला माहिती आहे काय ते स्पष्ट केले जावे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**मा. उप—महापौरजी, आपण आयुक्तांना या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी सांगा.

**<u>आयुक्त, श्री. अशोककुमार रणखांब:—</u>**मा. महापौरजी, उपस्थित सर्व मान्यवर, याठिकाणी श्री. मनसुलकर यांनी मा. महापौरांच्या मार्फत उत्तराची मागणी केली आहे. त्या संदर्भामध्ये माझ्याकडे त्या त्या वेळचे पुरावे उपलब्ध आहेत. ज्यावेळेस ते माझ्याकडे आले होते त्यावेळेस त्यांना मी सांगितले होते की, आज अक्षयतृतिया आहे. तुम्ही आज माझ्याकडे येवु नका. मला वेळ नाही. तरी सुध्दा त्यांनी मला सांगितले की, मला २६ तारखेला दिल्लीला एक मिटींग आहे. जर तुम्हांला आता वेळ

नसेल तर मी घरी येतो. तरी मी त्यांना सांगितले की, मी आज उपलब्ध होवु शकत नाही. माझ्याकडे तुम्ही येवु नका. या महापालिकेचे शहर अभियंता त्याठिकाणी उपस्थित होते. त्यांच्यासमोर ही चर्चा झाली. आणि त्यांना माझ्याकडे येवु नको असे सांगितले होते.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**कुण्या अधिका–याची अशी हिम्मत आहे का की, आयुक्त नाही म्हणतात तरी अधिकारी त्यांच्या घरी जातात. आपण येवु नका म्हटले तरी ते घरी आले? जरुर यामध्ये काहीतरी वेगळीच गोष्ट असेल. मा. महापौरजी, उप–महापौरजी मला बोलु दिले जावे. खरी श्रध्दांजली श्री. अभिजितला दयायची असेल तर सर्व सदस्यांना मी विनंती करतो की, एक असा ठराव तयार करा की, आयुक्त श्री. अशोककुमार रणखांब यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी ठराव तयार करा. एका निष्पाप कर्मचा–याचा मृत्यु झाला आहे. त्याची पुर्ण जबाबदारी आयुक्तांवर आहे. ते आपल्या घरी महापालिकेचे कार्यालय चालवितात. महापालिकेत अनुपस्थित राहुन आपल्या घरी अधिका–यांना फाईली घेवुन बोलाविणे, त्यांची सतावणुक करणे. जर आपण त्यास बोलाविले नव्हते तर कोणत्या अधिका–यामध्ये अशी हिम्मत आहे आपल्या घरी येण्याची? जबरदस्तीने येत होते का ते? व तो त्याच्याबरोबर ठेकेदाराला घेवुन येत होता. मी सभागृहाला विनंती करतो की, या आयुक्तांच्याबाबतीत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी एक संयुक्तीकपणे ठराव तयार करुन तो शासनास पाठविला जावा. जेणेकरुन यापुढे कोणताही अधिकारी आपल्या घरी महापालिकेचे कार्यालय चालवु शकणार नाही.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**सन्माननिय महापौरजी, स्वर्गीय श्री. अभिजित यांस श्रध्दांजली दिली गेली. आपल्या महापालिकेमध्ये ही एक अशी दु:खदायक घटना घडली आहे, या मुद्दयाबाबत आपणांस ना केवळ खोलवर विचार करावयाचा आहे. जर यामागे कुणाची चुक आहे तर ही वेळ आहे त्याने आत्मचिंतन करण्याची. भले मग तो कोणीही असो. कुणाच्या चुकीमुळे एका कुटुंबातील तरुण व्यक्ती निघुन जातो, तर त्या मागे माझी काय कुणाची चुक आहे काय? त्याबाबत आत्ममंथन केले पाहिजे. व मी मा. आयुक्त साहेबांकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की, ही घटना घडण्या अगोदर काय स्व. अभिजित आपल्या घरी कधी आले होते? आपण प्रामाणिकपणे या सभागृहास सांगा.

**आयुक्त, श्री. अशोककुमार रणखांब:–**श्री. राजु जग्यासी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबत सांगु इच्छितो की, कोणतेही तातडीचे काम जर असेल तर माझ्याकडे बरेचसे कर्मचारी येतात. व या अगोदर सुध्दा ब–याचवेळा कर्मचारी आले. जे मोठ मोठे प्रकल्प होते त्यांच्यावर चर्चा करण्यासाठी कार्यालयात वेळ मिळत नाही. त्यावेळेस आम्ही चर्चा करतो. व अशी चर्चा केली आहे. व ठराविक, त्यादिवशी मी सांगितले होते की, आज चर्चा होवु शकत नाही. मला सुध्दा काम आहे. प्रत्यक्षात तेथे बाकी अधिकारी सुध्दा उपस्थित होते. त्यांनाही सांगण्यात आले होते की, आज वेळ नाही. परंतु श्री. मनसुलकर यांनी प्रश्न उपस्थित केला की, आयुक्त जर म्हणत असेल की, येवु नका तर कुण्या कर्मचा–याची काय हिम्मत आहे येण्याची, असे नाही काही संबंध असे असतात, श्री. अभिजित खुपच चांगला आणि कार्यक्षम अधिकारी होता. व ज्यावेळी मी सांगितले होते की, आज मला वेळ नाही तरी त्यांनी सांगितले होते की साहेब मला वेळ दया मला चर्चा करावयाची आहे, २६ तारखेला दिल्लीला मिटींग आहे. व त्या मिटींगबाबत चर्चा करायची आहे. त्यावेळेस मी त्यांना सांगितले की खरच आज मला वेळ नाही. तरी सुध्दा ते त्यादिवशी आले, त्यांनी मला फोन केला की आपण सांगितले तरी सुध्दा मी येत आहे. कारण की आता माझ्यासाठी एकच दिवस उरलेला आहे. २६ तारखेला मला प्रेझेंटेशन दयायचे आहे, ते प्रेझेंटेशन आपणांस दाखवायचे आहे. ते प्रेझेंटेशन दाखविण्यासाठी मी येत आहे. त्याचवेळी मी त्यास सांगितले होते की खरचं माझ्याकडे वेळ नाही. यावेळी माझ्याबरोबर अधिकारी होते, ते साक्षीदार आहेत. या अगोदर चार चार तास चर्चा झालेली आहे. ई गव्हनर्न्सचा प्रकल्प तयार केला, खुपच चांगला प्रकल्प तयार केला. महाराष्ट्र शासनाने त्याबाबत प्रशंसा केली. त्याचे सर्व श्रेय श्री. अभिजितला जाते. व त्याने खुप चांगले काम केले होते. व माझे हे स्पष्टपणे मत होते.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:–**सन्माननिय आयुक्त साहेब, आपल्याबाबत असे काही बोलण्याचा माझा हेतु नव्हता. माझे केवळ एवढेच बोलणे होते की, कोठे ना कोठे संपुर्ण सभागृह, पुर्ण महानगरपालिका हे जाणते जी सच्चाई आहे. या महानगरपालिकेत आपली जेवढी उपस्थिती असायला पाहिजे तेवढी नाही. उपस्थिती कमी आहे. भलेही मग ती महासभा असेल, भलेही ती स्थायी समिती असेल,

भलेही कोणतीही महत्वाची बैठक असो, आयुक्त कधीच दिसुन येत नाहीत. ही गोष्ट संपुर्ण सभागृह मान्य करेल. भलेही सत्ताधारी पक्षाचे सदस्य असोत की विरोधी पक्षाचे सदस्य असोत.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :—**मा. महापौर, उप—महापौर, हा विषय आहे कुठे? हे कोणता विषय कोठे घेवुन चालले आहेत?

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—**आपण मध्ये का बोलत आहात?

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**श्री. जीवन इदनानीजी मी केवळ एक सेकंद बोलु इच्छितो. सचिव साहेब, यापुढे असा एक नियम तयार केला पाहिजे की कुणाच्याही चुकीमुळे अशा प्रकारची दुर्घटना किंवा आणखी वेगळया प्रकारची दुर्घटना घडु नये कुणीही अधिकारी, कर्मचारी महानगरपालिकेत पुर्ण वेळ बसुन काम करत असेल तर अशा घटनांवर आपण अंकुश लावु शकतो.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—**मा. महापौरजी, मला थोडच बोलायचे आहे. जर श्री. अभिजित यास खरी श्रध्दांजली दयायची असेल तर श्री. अशोककुमार रणखांब यांच्यावर, श्री. अभिजित यांच्या सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासंदर्भात ठराव तयार करुन शासनाकडे पाठविला जावा. यानंतर कुठलाही अधिकारी आपल्या घरी महापालिकेचे कार्यालय चालविणार नाही. अधिका—यांना आपल्या कार्यालयीन कामकाजानंतर आपल्या कुटुंबियांना म्हणजेच बायको—मुलांना, आई—वडिलांना वेळ दयायची आहे. कोणत्याही अधिका—यास आपल्या घरी बोलावु नये.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्तजी, व सचिव साहेब, आयुक्तांनी त्यास बोलाविले, व ते गेले. यावर सभागृहात चर्चा चालली आहे, त्याचे वा कुणाचेही मरण जेथे लिहिले आहे, ते निश्चितपणे होणेच आहे. ना यामध्ये आयुक्तांची चुक आहे, ना श्री. अभिजितची चुक आहे. हे तर परमेश्वराच्या मर्जीनुसारच होते. यामध्ये कुणाचीही काही चुक नाही.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—**मा. महापौरजी, कमीत कमी सत्ताधारी पक्षाचे सदस्याचे तरी समाधान करा.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**मा. महापौरजी, आयुक्तांच्या विरोधात ही जी काही चर्चा चालु आहे, ती बरोबर आहे. कारण की काही दिवसापुर्वी येथे सिंधी भाषेचा अपमान झाला होता. त्यास जबाबदार आयुक्त साहेब आहेत. कारण की, दहा दिवसापुर्वी मनसेच्या कार्यकर्त्यांने त्यांना पत्र दिले होते. आपल्या महानगरपालिकेमध्ये सिंधी भाषेत फलक लिहिले आहेत. ही जबाबदारी उल्हासनगर महापालिकेतील आयुक्तांची असते. काही वर्षापुर्वी येथे सिंधी आणि बिगर सिंधी लोकांमध्ये दंगल झाली होती. काही लोकांनी सिंधी भाषेतील फलकास काळे फासले होते. हा सिंधी भाषीकांचा सर्वात मोठा अपमान आहे. या भाषेचा अपमान झाला आहे. आयुक्त महासभा व स्थायी समितीलाही उपस्थित राहत नाहीत. आपल्या कार्यालयातही उपस्थित राहत नाहीत. मी तर असे म्हणेन की हे आयुक्त या महापालिकेत राहण्याच्या लायकीचे नाहीत. कारण की ते स्वत: आपली जबाबदारी सांभाळु शकत नाहीत. त्यादिवशी या शहरात दंगल झाली असती महानगरपालिकेत जो सिंधी भाषेचा अपमान झालेला आहे त्याबाबत मोठी घटना घडु शकली असती. परंतु येथिल सिंधी भाषीक नेत्यांनी त्या गोष्टीकडे जास्त लक्ष न दिल्यामुळे दंगल झाली नाही. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. परंतु मा. आयुक्तांच्या विरोधात मी सभात्याग करतो. कारण की हे आयुक्त महासभा चालविण्यास लायक नाहीत. यासाठी सभात्याग करुन मी बाहेर जात आहे.

यावेळी सदस्य श्री. सुरेश जाधव हे सभात्याग करुन सभागृहातुन बाहेर गेले. 

**उप—महापौर:—**सचिव साहेब, सभेचे पुढील कामकाज चालु करा.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**सत्ताधारी पक्षाचा एक नगरसेवक सभात्याग करुन बाहेर गेला हे अतिशय निंदनीय आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**आपण त्याची चिंता करु नका. आपण आपली चिंता करा.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**आम्ही शहराची चिंता करु. शहरवाशियांची चिंता करु. सत्ताधारी पक्षाचा एक नगरसेवक सभात्याग करुन जात आहे ही अतिशय शरमेची गोष्ट आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**प्रश्न उत्तराचा तास वगळा.

**महापालिका सचिव:—**सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा प्रस्ताव आहे की, प्रश्नोत्तराचा तास स्थगित केला जावा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यापुर्वी मला बोलु दया, त्यानंतर भलेही आपण प्रश्नोत्तराचा तास वगळा. सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत जे काही बोलत आहेत ते बरोबर आहे. आमचे पत्र किती तारखेपर्यंत पोहचले पाहिजे. व त्यानंतर तो प्रश्न महासभेत आला पाहिजे. हा एक पहिला मुद्दा आहे. तसेच या सभागृहाचा जो पहिला प्रश्न आहे त्याचे जे उत्तर दिले आहे ते हाताने लिहिले आहे. जेणेकरुन ते कुणाला समजु नये की कोणते प्राकलन कोठे गेले आहे आणि कोणते काम कोठे गेले आहे? महापालिकेतील संगणक जळाले आहेत काय? मा. महापौरजी पुढील महासभेत या प्रश्नाचे व्यवस्थित उत्तर आम्हांला मिळाले पाहिजे, संगणकावर टंकलिखित केलेले उत्तर मला मिळाले पाहिजे. कामांची ही जी स्थळे दर्शविली आहेत त्याबाबतची माहिती संगणकावर टंकलिखित केलेली असली पाहिजे. व माझा दुसरा जो प्रश्न आहे तो सभासूचना निघण्याअगोदरचा होता तोही स्विकृत केलेला नाही त्याचेही उत्तर मिळालेले नाही.

**महापालिका सचिव :—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यास कुणाची काही हरकत नाही ना? प्रश्नोत्तराचा तास वगळला जावा ना?

**काही सदस्य :—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यास कुणाची काही हरकत नाही. प्रश्नोत्तराचा तास वगळा.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबतीत खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

**महासभा ठराव क्र. ४ ब** **दिनांक :—१९/५/२०१२**

ही महासभा आज दिनांक १९/५/२०१२ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

**महापालिका सचिव :—** कृपया लक्ष दयावे. लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

**लक्षवेधी सूचना क्र. १**

सुचकाचे नाव :—श्रीमती जया साधवानी

**विषय :—**उल्हासनगर—३ येथिल स्वर्गीय राजीव गांधी उदयानाच्या नावांत केलेल्या बदलाबाबतची लक्षवेधी सूचना.

**लक्षवेधी सूचना क्र. २**

सुचकाचे नाव :—श्री मनोज दी. सयानी (लास्सी)

**विषय :—**पावसाळयापूर्वी ''घर दुरुस्ती परवानगी'' मिळणेबाबत लक्षवेधी सूचना.

**लक्षवेधी सूचना क्र. ३**

सुचकाचे नाव :— श्री मनोज दी. सयानी (लास्सी)

**विषय :—**शहरातील सार्वजनिक साफसफाईबाबत व जलवाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्याबाबत लक्षवेधी सूचना

या तीन लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**मा. महापौरजी, मी जी लक्षवेधी सूचना टाकली होती ती कोठे गायब झाली? या महानगरपालिकेतुन कागद कसे गायब होतात? एका नगरसेवकाने जी लक्षवेधी दिली आहे ती महानगरपालिकेत पोहचत नाही? ही कशी महानगरपालिका आहे? सचिव साहेब, एक नगरसेवक आयुक्त साहेबांना विचारत आहे, कृपया ऐकुन घ्या, आपल्या समोर जनप्रतिनिधी उभा आहे. बाकी लक्षवेधी आल्या त्यांच्या अगोदर मी लक्षवेधी सूचना दिली होती. ती कुठे गायब झाली? उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरीक सुविधा केंद्रामध्ये माझा माणुस लक्षवेधी सूचना देवुन गेला आहे. त्याची पोच पावती त्याच्याकडे आहे. ही कशी महानगरपालिका आहे? उप—आयुक्त असतांना फोन करतो तेव्हा सांगितले जाते की उप—आयुक्त नाहीत. त्यांच्या मोबाईलवर फोन केला तर मोबाईल बंद. कुण्याही अधिका—यास फोन करा त्यांचे फोन बंद असतात. ते कार्यालयात उपलब्ध नसतात. ही महानगरपालिका आहे की ग्रामपंचायत आहे? ती लक्षवेधी कुठे गेली याची चौकशी करा.

**उप—महापौर :—**सचिव साहेब, सभागृहाच्या सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबाबत आपण उत्तर दया लक्षवेधी सूचना आपणांस प्राप्त झाली आहे किंवा नाही व लक्षवेधी सूचना किती वेळ अगोदर व कोठे दिली पाहिजे? याची माहिती कृपया सभागृहास दयावी.

**महापालिका सचिव :—**मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबद्दल मी त्यांच्या भावनांचा आदर करतो. परंतु लक्षवेधी सूचना देण्याची पध्दत व रित आहे ती अशी आहे की, पहिली प्रत मा. महापौरांना दिली पाहिजे, दुसरी प्रत मा. आयुक्तांना दिली पाहिजे, तिसरी प्रत जी आहे ती सचिवांना दिली पाहिजे. अशा प्रकारे लक्षवेधी सूचना ३ कार्यालयात दिली जाते. व स्वत: येवुन दयावी लागते. आपण नागरीक सुविधा केंद्रात

लक्षवेधी सूचना दिली आहे. नागरीक सुविधा केंद्रातील अधिका—यांना लक्षवेधीची प्रथा माहित नसेल. त्यामुळे त्यांनी ती दुस—याच कठेतरी पाठविली असेल. यापुढे आपणास जर लक्षवेधी सूचना दयायची असेल तर ती मा. महापौरांना दया, आयुक्त साहेबांना त्यांच्या स्विय सहाय्यकांना दया व माझ्याजवळ दया. माझ्याकडे दिल्यानंतर ती योग्य ठिकाणी पोहचेल. आपली जी लक्षवेधी सूचना आहे ती आम्हांला प्राप्त झालेली नाही. त्यामुळे तीची नोंद नाही.

**<u>उप—महापौर:—</u>**सचिव साहेब, सभा सूचनेवरील विषय चालु करा.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**मी तिस—यांदा नगरसेवक म्हणुन निवडून आलो आहे. मा. महापौरजी, त्यांनी जे सांगितले त्याबद्दल मीही आपणांस सांगु इच्छितो. मी तीनवेळा निवडून आलेलो आहे, पहिल्यांदाच निवडून आलेलो नाही. मला माहिती आहे. नागरीक सुविधा केंद्र महानगरपालिकेने स्थापन केले आहे. त्यामध्ये आम्ही जर कोणतेही कागदपत्र पोहचवत असू तर ते महानगरपालिकेत पोहचला पाहिजेत. महासभेच्या २ तास अगोदर जर कोणी नगरसेवक लक्षवेधी सूचना देत असेल तर ती सुध्दा स्विकृत होवु शकते. मी तर तीन चार दिवसाआधी लक्षवेधी सूचना दिली आहे.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**मा. महापौरजी, आपण माझ्या लक्षवेधीबाबत अदयाप निर्णय दिला आहे की नाही?

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. महापौरांनी तिन्ही लक्षवेधी सूचना अस्विकृत केल्या आहेत.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**मा. महापौरजी, माझे असे निवेदन आहे की, माझी जी लक्षवेधी आहे ती हरकतीचा मुद्दा म्हणुन घेतली जावी. कारण की तो खुपच जरुरीचा विषय आहे. यासाठी मी आपणाकडे अनुमती मागते की तो विषय हरकतीच्या मुद्दयांन्वये घेतला जावा.

**<u>उप—महापौर :—</u>**मा. सभागृहाचे सर्व सदस्य, स्थायी समिती सदस्यांना व गटनेत्यांना अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी बैठकीला जायचे आहे. यासाठी प्रश्नोत्तराचा तास सुध्दा वगळण्यात आला आहे. व लक्षवेधी सूचना सुध्दा वगळण्यात आल्या आहेत. परंतु आमच्या भगिनी श्रीमती जया साधवानी यांचा हरकतीच्या मुद्दयाद्वारेचा लक्षवेधीचा जो विषय होता, त्याबद्दल मी आयुक्त साहेबांना निवेदन करेल की, ज्याठिकाणी अगोदर पासुन स्व. राजीव गांधी उदयान असे नाव देण्यात आलेले आहे. त्या संदर्भात त्वरीत कार्यवाही करावी.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**मा. महापौरजी, माझे असे निवेदन आहे की, आमचे कॉंग्रेसचे माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांच्या कार्यकालावधीत सपना गार्डनचे स्व. राजीव गांधी उदयान असे नामकरण करण्यात आले आहे. ते हटविणे योग्य नाही. ती आमच्या भावनांना ठेच पोहचविण्यासारखी आहे. ते सर्वांचे पंतप्रधान होते. असे नाही की कुण्या एका व्यक्तीचे होते. माझे असे निवेदन आहे की, सपना गार्डन येथे जे फलक लावण्यात आलेले आहेत ते त्वरीत हटविलेच पाहिजेत. व नुतनीकरणाचे जे कामकाज चालले आहे त्या ठिकाणी प्रत्येक कोप—या कोप—यामध्ये स्व. राजीव गांधीचे नाव मोठया व ठळक अक्षरात लावले पाहिजे त्यामध्ये आपणा सर्वांचाही मान आहे. व आमचाही मान आहे.

**<u>उप—महापौर:—</u>**आम्ही आपल्या मुद्दयाविषयी आयुक्तांना अवगत केले आहे. ते त्वरीत कार्यवाही करतील.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**अशा प्रकारचे आश्वासन आयुक्त साहेब देत असतील तर..............

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**आयुक्त साहेबांनी याविषयी आश्वासन दयावे, एकदा नाव दिले असतांना ते नाव बदली करुन दुसरे नाव दिले जावु शकते काय? ठराव पारीत करण्याच्या वेळेस सांगितले जाते की, अगोदर जे नाव ठेवण्यात आलेले आहे त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार कुणालाही नाही.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**ही सपना आहे कोण? तेच मला समजून येत नाही.

**<u>उप—महापौर :—</u>**सचिव साहेब, पुढील कामकाज चालु करा.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**मी हरकतीच्या मुद्दयान्वये बोलत आहे. उप—महापौरजी आपण सांगा.

**<u>उप—महापौर :—</u>**आयुक्त साहेब, आपल्या अधिका—यास तेथे पाठवतील. आपण माहिती दिली आहे ते काम तेथे होईल. व त्वरीत होईल. केवळ आपलेच नाही तर या सभागृहामध्ये नामकरणाचे जेवढे काही प्रस्ताव पारीत झाले आहेत, ती नावे कधीही बदली केली जाणार नाहीत व दुसरी नावे दिली जाणार नाहीत. याबाबत कुणाला काही अडचण असेल तर ते आयुक्त साहेबांना भेटु शकतात. व काम करुन घेवु शकतात.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**नाही, नाही महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचे आमचे सदस्य यांनी १४/५/२०१२ रोजी पत्रान्वये हा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यानुसार आजपर्यंत याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यांनी आमरण उपोषणाचे पत्र दिले आहे त्यानंतरही कोणतीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे मजबुरीने हे पाऊल मला उचलावे लागले आहे. मा. महापौरांवर विश्वास ठेवुन, उप—महापौरांवर विश्वास ठेवुन मी सांगु इच्छिते की, जर काम होत नसेल तर पुढील महासभेत ही लक्षवेधी पुन्हा चर्चेस आणली जावी. मला पुर्ण विश्वास आहे की हे काम होवुन जाईल.

**<u>महापौर :—</u>**श्रीमती जया साधवानीजी मी आपणाबरोबर आहे.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**महोदया, आभारी आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रशासनाकडुन आयत्यावेळचे विषय म्हणुन पुढील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत आपली मान्यता असल्यास ते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येतील.

**विषय क्र. १ :—** कै. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, उ.मपा. यांच्या अकाली निधनामुळे

त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे.

हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घ्यायचा आहे? कुणाची काही हरकत नाही?

**<u>काही सदस्य :—</u>**काही हरकत नाही.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**आपल्या सर्वानुमते सदरहु विषय पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे. 

---

**विषय :—** आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

<u>महासभा ठराव क्र. :— ४ क</u> <u>दिनांक :</u>

<u>१९/५/२०१२</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील दोन विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १:—** कै. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, उ.मपा. यांच्या अकाली निधनामुळे
त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे.

**विषय क्र. २:—** १ एप्रिल २०१२ ते १९ एप्रिल २०१२ या कालावधीत महापालिकेला
झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————————————

⇨ <u>**विषय क्र. २ :—**</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १२/३/२०१२ (त्यात २८/३/२०१२) व
४/४/२०१२ (त्यात ९/४/२०१२) तसेच विशेष महासभा दिनांक १९/४/२०१२
रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**महापौर :—**</u> मागील सभेचे दिनांक दिनांक १२/३/२०१२ (त्यात २८/३/२०१२) व ४/४/२०१२ (त्यात ९/४/२०१२) तसेच विशेष महासभा दिनांक १९/४/२०१२ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ विषय क्र. २ :— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १२/३/२०१२ (त्यात २८/३/२०१२) व
४/४/२०१२ (त्यात ९/४/२०१२) तसेच विशेष महासभा दिनांक १९/४/२०१२

रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव : श्री. राजु जग्यासी

**महासभा ठराव क्र. ४ ड**
**दिनांक:—१९/५/२०१२**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १२/३/२०१२ (त्यात २८/३/२०१२) रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते २९ पर्यंतचे व दिनांक ४/४/२०१२ (त्यात ९/४/२०१२) रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते ३७ पर्यंतचे तसेच दिनांक १९/४/२०१२ रोजीच्या विषेश महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात
————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३:—** श्रीमती द्रोपदी सुदाम झारेकर सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणे.
————————————————————————————————————————————

**सदस्य श्री. राजेद्रसिंह भुल्लर :—**एक मिनिट, मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, या विषयावर चर्चा चालु करण्याअगोदर हरकतीच्या मुद्दयान्वये मी एक मुद्दा उपस्थित करु इच्छितो, आम्ही १२ रस्त्यांची कामे मंजुर केली होती. ज्या ठेकेदारांना या रस्त्यांची कामे देण्यात आली होती, त्यांनी त्यातील एकाही रस्त्याचे काम पुर्ण केले नाही. याबाबतीत मला असे म्हणायचे आहे की, जेवढे काही ठेकेदार आहेत त्यांना काळया यादीत टाकले जावे. शहाड पासुन चोपडा कोर्टपर्यंत रस्ता एवढा खराब आहे की त्या रस्त्यावरुन लोक पायी सुध्दा चालु शकत नाहीत. अशी त्याची स्थिती आहे. धोबीघाटचा रस्ता आहे, तो रस्ताही असा आहे की तेथे सुध्दा लोक पायी चालु शकत नाहीत. आयुक्त साहेब, आपला कोणी अधिकारी आहे का याबाबतीत स्पष्टीकरण करण्यासाठी? असेल तर त्यास फोन लावा. कनिष्ठ अभियंत्यांना ठेकेदार आई—बहिणीवर शिव्या देतात. ते आपल्यापेक्षा वरिष्ठ आहेत काय?

यावेळी सदस्या श्रीमती शकुंतला जग्यासी, श्रीमती लिलाबाई आशान, सदस्य श्री. रामचंद्र पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**आम्हांला सुध्दा हेच वाटत होते. ज्या रस्त्यांना मंजुरी मिळालेली आहे, ज्या ठेकेदाराला कामे दिली आहेत, कार्यादेश दिले आहेत, त्यांविषयी आमची सुध्दा मागणी आहे. आमची दुसरी कोणतीही मागणी नाही.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**कुणी बोलत असतांना मध्येच मी बोलत नाही, त्यामुळे मी बोलत असतांना मध्ये कुणीही बोलु नये. आयुक्त साहेब, रस्त्यांविषयी माहिती देणारा अधिकारी कोण आहे? रस्त्यांचे काम चालु का होत नाहीत? या १२ रस्त्यांमध्ये जे कोणी ठेकेदार आहेत त्यांना काळया यादीमध्ये टाकले पाहिजे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**मा. महापौर महोदया, नेताजी चौक हे मध्यवर्ती ठिकाण आहे, ३ वर्ष झाली त्या रस्त्याचे काम होत नाही.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**सन्माननिय आयुक्त साहेब, अधिका—यांना माहित नाही का आज महासभा आहे ती. सार्वजनिक बांधकाम विभागातील कुणीही अधिकारी महासभेत उपस्थित नाही.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**नाही, नाही नेताजी चौकातील स्थिती काय आहे ती पहा आपण? तेथे इतकी दयनिय स्थिती आहे, जसे आपण गावात पोहोचलो आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**सन्माननिय महापौरजी आपण आदेश दया की यांनी ठेकेदारांवर कारवाई केली पाहिजे. उप—महापौरजी, आपण सुध्दा आमदारांबरोबर बाहेर उपोषणास बसला होतात.

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी, सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**उप—महापौर :—**सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराजजी, यांनी जो विषय उपस्थित केला आहे, तो विषय अत्यंत गंभीर आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांची प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते आज येथे उपस्थित नाहीत. मा. महापौरांच्या आदेशानुसार मी आयुक्त साहेबांना निर्देशीत करतो की, ज्या ठेकेदारांनी रस्त्यांची अदयाप कामे सुरु केली नाहीत त्यांना सात दिवसाची नोटिस देवुन त्वरीत कामे सुरु करावीत. नाही तर त्यांना काळया यादीत टाकावे. असा मा. महापौरांचा आदेश आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—**रस्त्यांच्या दुर्दशेमुळे किती लोकांचे अपघात झाले, वेळे अगोदरच किती महिलांच्या प्रसृती झाल्या. किती लोकांना पाठीच्या मणक्यांचे आजार झाले. त्यास जबाबदार कोण आहे? आपला आजारी असलेला कार्यकारी अभियंता? की पीठासीन अधिकारी?

**उप—महापौर :—**आयुक्त साहेब, ७ दिवसांची नोटिस दया. जर ७ दिवसामध्ये काम सुरु होत नसेल तर त्यांना काळया यादीत टाका. असा मा. महापौरांचा आपणांस आदेश आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**सन्माननिय महापौरजी, सचिव साहेब, अहो, आम्ही मागे बसलो आहोत याचा अर्थ असा नाही की आम्ही काही बोलु नये. सन्माननिय महापौरजी, आता आमचे सन्माननिय श्री. भुल्लर महाराज यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, शहाड फाटक ते महापालिका या रस्त्याचे काम मंजुर होवुन किती दिवस व वर्ष झाली पण अदयाप ठेकेदाराने त्या रस्त्याचे काम सुरु केले नाही, याबाबत मी कित्येक वेळा आयुक्त साहेबांनाही सांगितले आहे. आयुक्त साहेब, ते हसण्यावर घेतात, काय श्री. शिर्केजी त्या रस्त्याचे काम अदयापपर्यंत चालु करत नाही? तर मी अशी विचारणा करु इच्छितो की, पावसाळा सुरु होण्यास आता किती वेळ राहिला आहे? मा. महापौरजी आपण आपली गाडी घेवुन जा. सी—ब्लॉक मधुन आपली गाडी जर सही सलामत आली तर, आपण जी सांगाल ती शर्यत मी हारेन. उल्हासनगर महानगरपालिकेत जर अशी स्थिती असेल तर बरे वाटत नाही. एक जरी पाउस झाला तरी रस्त्यांवरुन चालतांना कपडे खराब झाल्याशिवाय राहणार नाहीत. तो रस्ता केवळ माझ्या प्रभागाचा नाही. शहाड फाटक वरुन जेव्हा आपले आयुक्त साहेब येतात व महापालिकेचे

काही अधिकारी येतात, तोच रस्ता एवढा खराब आहे. बाहेरच्या एखादया माणसाने हा रस्ता बघितला तर म्हणेन काय ही महानगरपालिका आहे? ते आयुक्त साहेबांना बोलणार नाही. महापौरजी आपण लक्षात घ्या. व त्या ठेकेदाराने लवकरात लवकर काम जर केले नाही तर त्यांना काळया यादीमध्ये टाका ना.

**<u>उप–महापौर :–</u>**मा. सदस्य श्री.बी.बी. मोरेजी आज आम्हांस अर्थसंकल्पीय बैठकीसाठी जायचे आहे. त्यासाठी आम्ही आज प्रश्नोत्तराचा तास सुध्दा रद्द केला आहे. तर मी सर्व सदस्यांना निवेदन करतो की, विषय पत्रिकेच्या बाहेरील कोणताही विषय कृपया आज उपस्थित करु नये. असे केल्यास आपली खुप मोठी मेहरबानी होईल. सचिव साहेब आपण विषय पत्रिकेवरील पुढील विषय वाचा.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>**उप–महापौरजी, आपणांस आम्ही धन्यवाद देतो. आज आपण व्यासपीठावर बसला आहात. आम्ही खाली बसलो आहोत. आम्ही बोलतो, आवाज करतो, रडत आहोत, आज आपण व्यासपीठावर बसल्यानंतर आम्हांस विनंती करता ते बरोबर नाही. उल्हासनगर महानगरपालिकेने ज्या रस्त्यांच्या कामांना मंजुरी दिली आहे ते रस्ते आज आपण जावुन पहा. त्यांना मंजुरी देवुन किती वर्ष झाली आहेत? कोण त्याकडे लक्ष देत नाहीत. मी तर असा विचार करतो की, आजची ही महासभा रद्द केली जावी. व अर्थसंकल्प लवकरात लवकर तयार केला जावा. व रस्त्यांची कामे लवकरात लवकर कशी होतील ते पहावे. सभा स्थगित करा. काय आहे महापालिकेमध्ये? आम्ही बोलतो आपण ऐकुन घेता हे बरोबर नाही.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आशान, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>** आयुक्त साहेब, सर्व सभागृहाची भावना एकच आहे, एक दिड वर्षापूर्वी जे रस्ते मंजुर केले आहेत त्यानंतर डांबरीकरणाचे प्रस्ताव मंजुर केलेत, ती कामे तातडीने करणे हे प्रशासनाचे काम आहे. आणि हा जो रोश आहे तो त्यामुळे आहे, महापालिकेच्या क्षेत्रामध्ये कामे झाली पाहिजेत आणि महापालिकेने प्रस्ताव पारित केल्यानंतर त्याची अमलंबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. त्यात तुम्ही कुठेतरी कमी पडता, त्यासाठी तुम्ही तातडीने मंजुर करा, मंजुर झालेली कामे तातडीने चालु करा, नाहीतर त्याच्यावर कारवाई करा, मग ती डाबंरीकरणाची कामे असतील व ठेकेदार कुणीही असो. एकतर तुम्ही काम चालु करा नाहीतर कारवाई करा एवढेच, विषय सपंलेला आहे. कामे चालु करण्यासाठी आपणांस काही अडचण आहे का? नसेल तर मा. महापौर महोदया व उप–महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे. तातडीने कामे चालु करा, नंतर पावसाळा येणार आहे.

यावेळी सदस्य श्री. रामचंद्र पारवानी, श्री. नरेंद्रकमार ठाकुर, श्री. राजु जग्यासी यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

**<u>आयुक्त, श्री. अशोककुमार रणंखाब:–</u>** मा. महापौर महोदया, यावर खुलासा करणे मला अतिआवश्यक वाटते. कि ज्या ज्या ठेकेदारांना कामे दिलेली आहेत, त्या ठेकेदारांना किमान चार ते पाच वेळा माझे दालनामध्ये बैठकीसाठी बोलावले होते, त्यानंतर दोन ते तीन वेळा मा. महापौर महोदयांच्या दालनामध्ये बैठक घेतलेली आहे. ज्यावेळेस कामे वाटप करण्यात येत होती, त्यावेळेस महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहामध्ये सबंधींत लोकांच्या उपस्थितीमध्ये नगरपालिकेची सर्व आर्थिक परिस्थिती त्यांना खुलासेवार सांगितलेली होती, आणि त्याना जर महानगरपालिका वेळेवर निधी उपलब्ध करुन देत नसेल तर तुम्ही कामे घेवु नका अशी स्पष्ट कल्पना संबंधीत विभागाचे अधिका–यांनी त्यावेळी तेथे ज्या पक्षाचे प्रमुख उपस्थित होते त्यांच्या समक्ष दिली होती. त्यानंतर देखील याचा पाठपुरावा केला, मी स्वत: त्यांना चार चार नोटीसा दिलेल्या आहेत, तरीसुध्दा ते काम करत नसतील तर मा. महापौरांनी दिलेल्या आदेशाानुसार त्यांना सात दिवसाच्या आत काळयायादीमध्ये टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास……

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३ :—** श्रीमती द्रोपदी सुदाम झारेकर सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. द्रौपती सुदाम झारेकर | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/०९/२०११ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ५** **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती द्रोपदी सुदाम झारेकर सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :–**४ सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:–**४ सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रीम. कांता साधु उमाप | ३१/०५/२०१२ |
| २ | श्रीम. रतन लक्ष्मण चोहाण | ३१/०५/२०१२ |
| ३ | श्रीम. हरकेश बांकेलाल | ३१/०५/२०१२ |
| ४ | श्रीम. उत्तम लहानु साळवे | ३१/०५/२०१२ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ६ **<u>दिनांक:–१९/५/२०१२</u>**

सुचकाचे नाव :– श्री. दिलीपकुमार जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ४ सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात
————————————————————————————————————————————————————

**विषय क्र. ५ :—**वारसा पध्दतीने ०७ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांच्या वारसास नियुक्ती देणे.

—————————————————————————————————————————————————————

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५:—** वारसा पध्दतीने ०७ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांच्या वारसास

नियुक्ती देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचा—याचे नाव | स्वेच्छा सेवानिवृत्त / मृत्यू दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. टिल्लु रामभाऊ सोनवणे | ३०/६/२०११ | श्री. नितीन टिल्लु सोनवाणे | मुलगा |
| २ | श्री. कंच्छी सुमेरा खैरालिया | ३१/५/२००५ | श्री. सचिन महिपाल खैरालिया | नातू |
| ३ | श्रीम. लक्ष्मी कालु ढकोलिया | ३१/३/२०११ | श्री. राकेश कालु ढकोलिया | मुलगा |
| ४ | श्रीम. चतुराबाई सोना पालांदे | ३१/१०/२०१० | कु. जया सोना पालांदे | मुलगी |
| ५ | श्रीम. केलाबाई मामचंद ढकोलिया | १२/१२/२००८ | श्री. मनिष मामचंद ढकोलिया | मुलगा |
| ६ | श्री. भगवान गोपाल साठे | २७/६/२०११ | श्री. विकास भगवान साठे | मुलगा |
| ७ | श्री. शिवाजी बली भालेराव | ३१/८/२०११ | श्री. पंडीत शिवाजी भालेराव | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७ <u>दिनांकः—१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पुष्पा बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने ०७ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे नावासमोर उल्लेखिलेल्या त्यांच्या ०७ नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ६ :—** वारसा पध्दतीने ४ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांच्या वारसास नियुक्ती देणे.

————————————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६:—** वारसा पध्दतीने ४ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांच्या वारसास नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४

नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचा–याचे नाव | स्वेच्छा सेवानिवृत्त / मृत्यू दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. लक्ष्मी ओमप्रकाश डिके | ३१/१२/२०१० | श्री. नंदु ओमप्रकाश डिके | मुलगा |
| २ | श्रीम. गीता धनराज वाल्मीकी | ३०/६/२०११ | श्री. दिनंश धनराज वाल्मीकी | मुलगा |
| ३ | दिवंगत. हरेश श्यामजी मांडविया | ०८/६/२०११ | श्रीम. पार्वती हरेश मांडविया | पत्नी |
| ४ | श्री. राजेंद्र प्यारेलाल बेहनवाल | ३१/७/२०११ | श्री. रविंद्र राजेंद्र बेहनवाल | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्रः</u> ८      <u>दिनांकः–१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के
अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने ४ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे नावासमोर उल्लेखिलेल्या त्यांच्या ०४ नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ७ :–** दिवंगत सफाई कामगार श्री. गणपत हरीशंकर गोयर यांच्या जागी श्रीमती सीमा

नटवर गोयर यांना वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

————————————————————————————————————————

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७:—** दिवंगत सफाई कामगार श्री. गणपत हरीशंकर गोयर यांच्या जागी श्रीमती सीमा

नटवर गोयर यांना वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचा—याचे नाव | मृत्यूचा दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणपत हरीशंकर गोयर | ३/३/२०१० | श्रीम सीमा नटवर गोयर | सुन |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ९ <u>दिनांक:—१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :— श्री. रामचंद्र पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिवंगत सफाई कामगार श्री. गणपत हरीशंकर गोयर यांच्या जागी श्रीमती सीमा नटवर गोयर यांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात
————————————————————————————————————————————————

**विषय क्र. ८ :—** मयत कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती देणेकामी दिनांक

२०/६/२०११ रोजी पारीत केलेल्या महासभा ठराव क्र. १८ मध्ये अंशत:
बदल करुन श्री. सुभाष पंढरीनाथ बोरुडे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरुडे
यांच्या नेमणूकीस मान्यता देणे.

————————————————————————————————————————————

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८:—** मयत कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती देणेकामी दिनांक
२०/६/२०११ रोजी पारीत केलेल्या महासभा ठराव क्र. १८ मध्ये अंशत:
बदल करुन श्री. सुभाष पंढरीनाथ बोरुडे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरुडे
यांच्या नेमणूकीस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक १/११/२०११ रोजीच्या विनंती केली आहे की, त्यांचे पती उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मजूर या पदावर कर्यरत होते. त्यांचा दिनांक २१/१२/२०११ रोजी निधन झाले आहे. मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये माझे पतीच्या जागी श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांची नेमण करण्यात आली आहे. सदर नेमणुक रद्द करून श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांची नेमणुक करण्यात यावी ही विनंती केली आहे.

श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक २४/२/२०११ रोजीच्या अर्जान्वये त्यांचा नातु श्री. गणेश आण्णासाहेब बारूडे यांची नेमणुक करणेसाठी अर्ज केला होता. श्री. गणेश आण्णासाहेब बोरूडे हे वारस नसल्याने त्यांची ठोक वेतनावर नेमणुक करण्यात आली नाही.

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर ठोक वेतनावर नेमणुक करण्यात आलेली आहे त्यानुसार श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांचे नांव पुर्वीच्या यादीवर असल्याने कार्यलयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११, २५ ऑक्टोंबर, २०११ रोजीच्या आदेशान्वये नेमणुक करण्यात आली आहे.

श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक १७ ऑगस्ट २०११ रोजी वडिलांच्या जागी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे

श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांनी नेमणुकीचे आदेश स्विकारलेले नाही. कै. पंढरीनाथ सखाराम बोरूडे यांच्या पत्नी श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांचे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांची नेमणुक करणेबाबत संमतीपत्र दिले आहे.

श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांनी श्री. सुनील पंढरीनाथ बोरूडे यांना नेमणुक करणेबाबत हरकत नसल्याचे ना हरकत तथा संमतीपत्र दिले आहे.

तरी श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी मागणी केल्याप्रमाणे श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांची नेमण रद्द करून श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांची नेमणुक करणेसाठी मा. महासभेच्च्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** १० **<u>दिनांक:—१९/५/२०१२</u>**

सुचकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मयत कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती देणेकामी दिनांक २०/६/२०११ रोजी पारीत केलेल्या महासभा ठराव क्र. १८ मध्ये अंशत: बदल करुन श्री. सुभाष पंढरीनाथ बोरुडे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरुडे यांच्या नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ९ :—** मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसांना करारपध्दतीने नियुक्ती देणे.

———————————————————————————————————————————————————

**महापालिका सचिव :—** पुढील ६ महीन्यासाठी मुदतवाढ दयायची आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—** पुढील आदेश होईपर्यंत, व सेवेमध्ये एक दिवसाचा खंड देवुन कार्यालयीन आदेश व महासभा ठरावासाठी त्याचा पगार थाबविंला जावु नये.

**महापालिका सचिव :—** हे पुढील आदेशापर्यंत ना?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** महासभेची एक भावना आहे की, वांरवांर हे विषय महासभेपुढे येतात त्यांना यासाठी तीन तीन महिने महासभेची वाट बघावी लागते तर महासभेची वाट न बघता, त्याना सेवेमध्ये एक दिवसाचा खंड देवुन जोपर्यंत त्यांच्या जागा खाली होत नाहीत, तोपर्यंत त्यांना मुदतवाढ दिली जावी. तीन महिने त्याना बिना पगार थाबांवे लागले. निवडणुक आली या तांत्रिक कारणामुळे प्रशासन त्याचा प्रस्ताव महासभेपुढे आणु शकले नाही, किंवा कधी कधी प्रशासनाकडुन दिरंगाई होते, तर या महासभेची अशी इच्छा आहे की, जोपर्यंत त्यांना कायमस्वरुपी सामावुन घेतले जात नाही तोपर्यंत त्यांना एक दिवसाचा खंड देवुन त्याना मुदतवाढ देण्यात यावी, जेणेकरुन त्यांना तीन तीन महिने पगारासाठी वाट बघावी लागणार नाही. अशाच प्रकारचे तीन चार विषय आहेत, विषय क्र. ९,१०,११,१२ आणि १३ हे विषय सहा सहा महिन्यांच्या मुदतवाढीसाठी महासभेपुढे येतात. भविष्यामध्ये त्यांना आपणास कायमस्वरुपी करायचे आहे त्याचा तो अधिकार आहे हक्क आहे, मग त्यांना वाट बघायला कशाला लावायची, म्हणुन जोपर्यंत त्यांना कायमस्वरुपी करत नाहीत तोपर्यंत सहा महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवुन आपण प्रशासनाच्यावतीने त्यांना मुदतवाढ देत चला. अशा प्रकारचा ठराव या ठिकाणी महासभेत घेण्यात यावा.

**महापालिका सचिव :—** ठिक आहे, पास, या सुधारणेसह.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** नक्की झाले ना? मा. महापौरजी, मा. श्री. म्हसाळ साहेबांनी उत्तर दयावे, नक्की आहे की नाही? नाहीतर ते परत काहीतरी मुद्द्दा काढतील.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त (मु.):—** मा. महापौर महोदया, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, सन्मा. सदस्यांनी, सभागृह नेत्यांनी जी सुचना केली त्याप्रमाणेच, नेहमीच सहा महिन्यांची मुदतवाढ देत

असतो, या लोकांचा ठराव आपण निवडणुकीच्या पहिलेच आपण ठेवला होता, परंतु सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसहिंता लागु झाली या तांत्रिक अडचणीमुळे मागच्या वेळेस हा विषय पुढे ढकलण्यात आला किंवा विषय सभासुचनेवर आला नाही. अशा अनेक अडचणीनंतर आता हा विषय या महासभेपुढे आलेला आहे. महापालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार आपण सहा सहा महिन्याची मुदतवाढ देत होतो, आता आपली जी सूचना आली आहे की, सहा महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवुन सेवा चालु ठेवण्याची त्याबाबतीत सांगु इच्छितो की, हे कर्मचारी काम करत होते परंतु पगाराची अडचण होती, ती आता एक दिवसाचा खंड देवुन मुदत वाढ देण्यामुळे निकाली निघाली आहे. आपण पगार महासभेच्या ठरावानंतर देत असतो.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** विषय क्र. ९ वर दर्शविलेले कामगार तुम्ही अनुकंपा तत्वावर कामावर घेतले आहेत. त्यांना जश्या जश्या आपणाकडे जागा रिक्त होतील तसे तसे त्यांना घ्यायचेच आहे. हे मान्य आहे. त्यानंतर पाणी पुरवठा योजनामध्ये ज्यांनी आपली जागा दिली आहे, त्यांना सुध्दा घ्यायचे आहे त्याबाबत महासभेने मान्यता दिली आहे. परंतु आपण त्यांना फक्त सहा सहा महिन्याची मुदतवाढ देतो. आणि दरवेळेस महासभेपुढे येण्यासाठी कधी तीन महिने कधी चार महिने त्यांना विना वेतन थांबावे लागते. प्रशासनाची ही अडचण दुर व्हावी म्हणुन हा ठराव आहे. सहा सहा महिन्यानंतर एक दिवसाचा तुम्ही त्यांना खंड दया आणि त्यांना पुन्हा मुदतवाढ आपण आपल्या स्तरावर दया.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**काही तांत्रिक अडचण आहे का? पुन्हा महासभेसमोर हा विषय आला नाही पाहिजे अशी विनंती आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**यासाठी ही महासभा आयुक्तांना व सामान्य प्रशासनाला प्राधिकृत करते की, जोपर्यंत त्यांना कायम सेवेत सामावुन घेण्याबाबत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत दर सहा महिन्याने एक दिवसाचा खंड देवुन मुदतवाढ देत जा. यासाठी आम्ही तुम्हांला प्राधिकृत करतो.

**<u>महापालिका सचिव :—</u>**१३ व्या क्रमांकाचा जो विषय आहे, त्या संदर्भात या पुढील सहा सहा महिन्याची जी मुदतवाढ राहिल ती आयुक्त साहेब आपल्या स्तरावर देत राहतील, त्यांना अधिकार प्रदान केले जात आहेत. या प्रकारचा ठराव ठिक राहिल. ठिक आहे?

**<u>काही सदस्य :—</u>**श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या सुधारणासह पास—पास......

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९:—** मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसांना करारपध्दतीने नियुक्ती देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर आदेशाचे दिनांकापासुन करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मा. महासभेमध्ये पारित झालेल्या ठरावानुसार वर्ग—क च्या उमेदवारांना मासिक रू ५७८०/— व वर्ग—ड च्या उमेदवारांना रू ५४६५/— या ठोक वेतनावर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१५१ /११, दिनांक २० ऑगस्ट, २०११ आदेशान्वये उमेदवारांची विविध संवर्गातील पदांवर खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यात आली होती. सदर नेमणुकीचा कालावधी दिनांक १९ फेब्रुवारी २०१२ रोजी संपुष्टात येत असुन दिनांक १९ व २०फेब्रुवारी २०१२ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने त्यामुळे त्यांना दिनांक २१/२/२०१२ रोजी एक दिवस सेवा खंड देवुन त्यांना दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासुन पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(लिपीक वर्ग — क)**

| **अ.क्र.** | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज के ठाकुर | लिपीक | मालमत्ता विभाग | सदर उमेदवार हजर झालेले नाही. |
| २ | श्री. विशाल ईश्वर निंगो | लिपीक | पाणी पुरवठा विभाग | |
| ३ | श्री. प्रतिक रमेश गायकवाड | लिपीक | जकात विभाग | |
| ४ | श्री. गिरिश गिरधारीलाल ठाकूर | लिपीक | जन्म मृत्यू नोदणी विभाग | सदर उमेदवार हजर झालेले नाही. |
| ५ | श्री. जितेंद्र महातिम सिंग | लिपीक | जन्म मृत्यू नोदणी विभाग | |
| ६ | श्री. संतोष आसाराम शिरसाट | लिपीक | जन्म मृत्यू नोदणी विभाग | |
| ७ | श्री. किरण अशोक मखरे | लिपीक | मालमत्ता विभाग | |
| ८ | श्री. मुकेश मु. पवार | लिपीक | नगरीक सुविधा केंद्र | |
| ९ | श्री. नितिन वसंत निकम | लिपीक | जकात विभाग | |
| १० | श्री. संदेश प्रभाकर भांडारकर | लिपीक | विद्युत विभाग | |
| ११ | श्री. शंकर प्रकाश रामरख्यानी | लिपीक | विद्युत विभाग | सदर उमेदवार हजर झालेले नाही |
| १२ | गौतम भिमा ससाणे | लिपीक | सामान्य प्रशासन विभाग | |
| १३ | श्री. रविंद्र सखाराम दंडगव्हाळ | लिपीक | लेखा परिक्षण विभाग | |
| १४ | श्री. राहुल सुभाष मोकळे | लिपीक | मालमत्ता विभाग | |
| १५ | श्री. शंकर भिकन अहिरे | लिपीक | उप आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय | |
| १६ | श्री. विकास शिवाजी तांबे | लिपीक | वाहन विभाग | |
| १७ | श्री. रूपेश दिलीप पवार | लिपीक | क्रिडा विभाग | |
| १८ | गौरव रा. कलवानी | लिपीक | नागरीक सुविधा केंद्र | |
| १९ | पुजा ओमप्रकाश गुरनानी | लिपीक | लेखा विभाग | |
| २० | श्रीम. सुलताना अब्दुल पिंजारी | लिपीक | महापालिका दवाखाना | |

**(शिपाई, वर्ग — ड)**

| **अ.क्र.** | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. दिपक चंद्रकांत जाधव | शिपाई | नागरीक सुविधा केद्र | |
| २ | श्रीम. सोनाली शामराव पाटणकर | शिपाई | क्रिडा विभाग | |
| ३ | श्री. मनोज सिताराम कांबळे | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | |
| ४ | मंज्या मल्लप्पा गौडा | शिपाई | महापालिका दवाखाना | |
| ५ | श्रीम.लाजवंती उदासी | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | |

**(मजूर, वर्ग — ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कु. उषा रूंजाजी त्रिभुवन | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| २ | श्री. सागर बबन दाभाडे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| ३ | श्री. केशव धर्मा नवले | मजूर | पाणी पुरवठा विभाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | कु. संतोष भानुदास काळे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| ५ | श्री. प्रतिक पोळेकर | मजूर | पाणी पुरवठा विभाग | |

**(विद्युत मदतनीस, वर्ग – ड)**

| अ.क्र. | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रवि शिवाजी देवरे | विद्युत मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| २ | श्री. भारत गोप शर्मा | विद्युत मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| ३ | श्री. पुंडलीक बारकू भोईर | विद्युत मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| ४ | श्रीम. कपिल पंडीत केणे | विद्युत मदतनीस | मा.उप महापौर कार्यालय | |
| ५ | वाल्मिक बाबुलाल पवार | विद्युत मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| ६ | श्री. सुधीर गुलाब दानी | विद्युत मदतनीस | विद्युत विभाग | |

**(वाहन मदतनीस, वर्ग – ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. संगिता दगडू शेजवळ | वाहन मदतनीस | सामान्य प्रशासन विभाग | |
| २ | श्री. सुनिल भागा मोकाशी | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| ३ | श्री. रामपाल मोतीलाल टाक | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| ४ | श्री. लक्ष्मण नाना शेरे | वाहन मदतनीस | सामान्य प्रशासन विभाग | |
| ५ | श्री. धनंजय पांडुरंग गायकवाड | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| ६ | श्रीम. गुलाब अनिल खंबाळकर | वाहन मदतनीस | सामान्य प्रशासन विभाग | |
| ७ | श्री. दिपक मारूती गायकवाड | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| ८ | श्री. गणेश बारकु म्हात्रे | वाहन मदतनीस | मा. स्थायी समिती कार्यालय | |
| ९ | श्री. शंकर बाबूराव भवाळ | वाहन मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| १० | श्री. मनोज रामलाल पवार | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| ११ | श्रीम. किरण सुरेश राजपूत | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| १२ | श्री संजय रोहिदास खंडागळे | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| १३ | श्रीमती सुवर्णा लक्ष्मणा मनवे | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| १४ | श्री. अमर अनंता शेलार | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| १५ | श्री. भगवान नामदेव खांबाळकर | वाहन मदतनीस | अग्निशमन विभाग | |

**(सफाई कामगार, वर्ग – ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक गंगाराम निकम | सफाई कामगार | आरोग्य विभाग | |
| २ | श्री. दिपक प्रभु गोतारणे | सफाई कामगार | आरोग्य विभाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री. नितिन बंडू जाधव | सफाई कामगार | आरोग्य विभाग | |

उपरोक्त विविध पदांवर मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांची तात्पुरत्या स्वरूपात ठोक वेतनावर सहा महिन्यासाठी दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासुन पुर्ननेमणुक करणेसाठी उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१५१/११, दिनांक २० ऑगस्ट, २०११ च्या आदेशामध्ये नमुद असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ११** दिनांक:–१९/५/२०१२

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे मयत झालेल्या कर्मचा–यांच्या वर उल्लेखलेल्या वारसांना वर्ग–३ व वर्ग–४ मध्ये अनुकंपा तत्वाने ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर करारपध्दतीने दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासुन पुढील ६ महिन्यासाठी ठोक वेतनावर नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १० :–**श्री. गोपीनाथ फुलोरे यांना दिनांक १७/४/२०१२ पासून मजूर/वॉलमन या पदावर
सहा महिन्याकरीता रु. ४४४०-७४४०-ग्रेड पे रु. १३०० या वेतन श्रेणीत तात्पुरत्या
स्वरुपात नियुक्ती देणे.

———————————————————————————————————————

**काही सदस्य :–**श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या सुधारणासह पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १०:–** श्री. गोपीनाथ फुलोरे यांना दिनांक १७/४/२०१२ पासून मजूर/वॉलमन या पदावर

सहा महिन्याकरीता रु. ४४४०-७४४०-ग्रेड पे रु. १३०० या वेतन श्रेणीत तात्पुरत्या

स्वरुपात नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

श्री. गोपीनाथ फुलोरे, **'मजुर/वॉलमन',** पाणी पुरवठा यांची दिनांक मा. महासभा ठराव क्र. ६४, दिनांक २१/१२/२०११ अन्वये दिनांक १५/१०/२०११ पासून पुढील सहा महिन्यासाठी नेमणुक करण्यात आली होती.

तरी श्री. गोपीनाथ फुलोरे यांची सेवा दिनांक १४/०४/२०१२ रोजी संपुष्टात आल्याने दिनांक १५/४/२०१२ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दिनांक १६/०४/२०१२ रोजी ०१ दिवसाचा खंड देवुन दिनांक १७/०४/२०१२ पासुन पुढील ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी **'मजुर/वॉलमन'** या पदावर रु. ४४४.—७४४०, ग्रेडपे १३०० या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:** १२ **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गोपीनाथ फुलोरे यांना दिनांक १७/४/२०१२ पासून मजूर/वॉलमन या पदावर सहा महिन्याकरीता रु. ४४४०-७४४०-ग्रेड पे रु. १३०० या वेतन श्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीस पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ११ :—**१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ

वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २८/२/२०१२ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने

पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे.

————————————————————————————————————————————

**काही सदस्य :—** श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या सुधारणासह पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११ :—**१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २८/२/२०१२ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, यांचेकडील दिनांक १६/१/१२ रोजीच्या पत्रान्वये पाले ते गायकवाड पाडा, उल्हसनगर — ५ दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलवाहिनीचे काम पुर्ण करण्याचे दृष्टीने बाधीत झालेले १) श्री. अशोक सखाराम वायले, २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्रम्हण तरे यांना स्थायी (कायम) स्वरूपी पदाचे आदेश देणेबाबत प्रस्तावित केलेले आहे.

मा. महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २४/८/२०११ रोजीच्या ठरावान्वये १) श्री. अशोक सखाराम वायले, २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्रम्हण तरे यांना दिनांक २५/८/२०११ पासुन पुढील ०६ महिन्याची मुदत वाढ देवुन रू.४४४०—७४४० या वेतनश्रेणीमध्ये मजूर/वॉलमन या पदावर नेमणुक करण्यात आली होती. ०६ महिन्याची मुदत दिनांक २५/२/२०१२ रोजी संपत आहे. परंतु दि. २५/२/२०१२ चौथा शनिवार व २६/२/२०१२ रोजी रविवार सुट्टी असल्याने दिनांक २४/२/२०१२ रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक २७/२/२०१२ रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक २८/०२/२०१२ पासुन पासुन पुढील ०६ महिन्यांकरीता **"मजूर/वॉलमन"** या पदावर तात्पुरत्या स्वरूपात रू. ४४४०—७४४० ग्रेड पे १३०० या वेतनश्रेणीत ०६ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात मुंबई प्रांतिम महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती करणेबाबत सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे..

**महासभा ठराव क्र:** १३ **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २८/२/२०१२ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात
———————————————————————————————————————
————

⇨ **विषय क्र. १२ :–** मयत कर्मचा–यांच्या वारसांना दिनांक २६ एप्रिल, २०१२ पासुन सहा महिन्याची

मुदतवाढ देणे.

----------------------------------------------------------------

**काही सदस्य :–** श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या सुधारणासह पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १२:–** मयत कर्मचा–यांच्या वारसांना दिनांक २६ एप्रिल, २०१२ पासुन सहा महिन्याची

मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर आदेशाचे दिनांकापासुन करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मा. महासभेमध्ये पारित झालेल्या ठरावानुसार वर्ग–क च्या उमेदवारांना मासिक रू ५७८०/– व वर्ग–ड च्या उमेदवारांना रू ५४६५/– या ठोक वेतनावर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११,दि. २५ ऑक्टोंबर, २०११ आदेशान्वये उमेदवारांची विविध संवर्गातील पदांवर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यात आली होती. सदर नेमणुकीचा कालावधी दिनांक २४ एप्रिल २०१२ रोजी संपुष्टात येत असुन दिनांक २५/४/२०१२ रोजी एक दिवस सेवा खंड देवुन त्यांना दिनांक २६ एप्रिल २०१२ पासुन पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(लिपीक वर्ग — क)**

| **अ.क्र.** | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. सिमरन नरेश सितलानी | लिपीक | जनगणना कक्ष | |
| २ | श्री. प्रकाश मधूकर जावळे | लिपीक | मालमत्ता विभाग | |
| ३ | श्री. विशाल लक्ष्मण ढोले | लिपीक | नगररचना विभाग | |

**(शिपाई, वर्ग — ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती द्वारकाबाई विष्णू लाटे | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | |
| २ | श्री. रोहित किशोर मानकर | शिपाई | पाणी पुरवठा विभाग | |
| ३ | श्री. दिलीप भागोजी निकम | शिपाई | पाणी पुरवठा विभाग | |

**(वाहन मदतनीस, वर्ग — ड)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र शालिक निकम | वाहन मदतनीस | पाणी पुरवठा विभाग | शेरा |
| २ | श्री. पवन सुरेश कमाने | वाहन मदतनीस | पाणी पुरवठा विभाग | |

उपरोक्त विविध पदांवर महापालिका सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांची तात्पुरत्या स्वरूपात ठोक वेतनावर सहा महिन्यासाठी दिनांक २६ एप्रिल २०१२ पासुन पुर्ननेमणुक करणेसाठी जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११, दिनांक २५ ऑक्टोंबर, २०११ च्या आदेशामध्ये नमुद असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: १४</u>

<u>दिनांक:–१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे मयत कर्मचा–यांच्या वर उल्लेखलेल्या वारसांना दिनांक २६ एप्रिल, २०१२ पासुन पुढील सहा महिन्यासाठी ठोक वेतनावर मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. १३ :–** श्री. बबलु गजानन भोईर यांना दिनांक २८/३/२०१२ पासुन पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे.

———————————————————————————————————————————

**<u>काही सदस्य :–</u>** श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या सुधारणासह पास–पास......

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १३ :–** श्री. बबलु गजानन भोईर यांना दिनांक २८/३/२०१२ पासुन पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. बबलु गजानन भोईर यांना मजूर या पदावर जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था /मुली/४११/११, दिनांक २५ मार्च २०११ व उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५२९/११, दिनांक १५/११/२०११ रोजीच्या रोजीच्या आदेशान्वये सहा महीने कालावधी करीता निवळ तात्पुरत्या स्वरूपात दरमहा ५५१३/– एवढया तत्वावर नेमणुक करण्यात आली होती. सदर कालावधीची मुदत दिनांक २६/०३/२०१२ रोजी संपली असुन दिनांक २७/०३/२०१२ रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक २८/०३/२०१२ पासुन पुढील सहा महीने कालावधी करीता निवळ तात्पुरत्या स्वरूपात दरमहा

५५१३/— एवढया तत्वावर नेमणुक करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u> १५** **<u>दिनांक:—१९/५/२०१२</u>**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. बबलु गजानन भोईर यांना मजूर या पदावर दिनांक २८/३/२०१२ पासुन पुढील सहा महिन्याची मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १४ :—** श्री. दिलीप गणपत कडव, मजूर यांची पत्नी श्रीमती कविता दिलीप कडव यांच्या

प्रसूतीसाठी झालेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेची( रुपये २,५८,९४५/- ची)

विशेष बाब म्हणुन प्रतिपूर्ती करणे.

——————————————————————————————————————————————————

**<u>महापालिका सचिव :—</u>**प्रशासनाने शिफारस केलेली आहे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**नियम काय म्हणतो? सचिव साहेब नियमाचा उल्लेख करा.

**<u>श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>**मा. महापौरजी, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांची लेखी मान्यता घेवुन त्यांनी लाईफलाईन हॉस्पीटल ठाणे येथे उपचार घेतलेले आहेत. जिल्हा शल्य चिकित्सकाने जर मान्यता दिली असेल तर हे अनुज्ञेय आहे. अनुज्ञेय गोष्टीसाठी प्रशासनाने शिफारस केली आहे.

यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**साहेब, आपला स्पष्ट अभिप्राय दया.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय:–**२ लाख ८७ हजार च्या ९० टक्के एवढा खर्च त्यांना अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे त्याची प्रतिपुर्ती करण्यासाठी मान्यतेसाठी आपण हा विषय ठेवलेला आहे.

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १४:–** श्री. दिलीप गणपत कडव, मजूर यांची पत्नी श्रीमती कविता दिलीप कडव यांच्या प्रसूतीसाठी झालेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेची( रुपये २,५८,९४५/- ची)

विशेष बाब म्हणुन प्रतिपूर्ती करणे.

**प्रस्तावना**

श्री. दिलिप गणपत कडव, मजूर यांनी त्यांची पत्नी श्रीम. कविता दिलीप कडव यांच्या प्रसूतीसाठी रु २,८७,७१७.४४ एवढा खर्च झाला आहे. त्याची रक्कम मिळणेबाबत दि. २१/११/२०११ रोजी विनंती अर्ज केला आहे.

श्रीम. कविता दिलीप कडव यांना दि. २९/६/२०११ रोजी व्ही एस. जनरल हॉस्पीटल, जिल्हा शल्यचिकित्सक ठाणे येथे प्रसूती करिता दाखल करण्यात आले असता त्यांना दोन मुली व एक मुलगा अशी तीन आपत्ये झाली सदर मुलांची प्रकृती चिंताजनक असल्याने दोन मुलांस उपचारार्थ दि. ३/७/२०११ रोजी लाईफ लाईन हॉस्पीटल ठाणे. येथे उपचार्थ दाखल करण्यात आले होते. त्यापैकीएक आपत्यास दि. १७/७/२०११ रोजी डिस्चार्ज देण्यात आला होता. व दि. १३/८/२०११ रोजी दुस–या मुलाला डिस्चार्ज देण्यात आला सदर कालावधीत त्यांना रु. २,८७,७१७.४४ एवढा खर्च आला आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ मधील ८(४) नुसार शासकिय रुग्णालयात उपलब्ध नसणारे विशेष प्रकारचे उपचार पुरविणा–या अशासकिय रुग्णालयात एखादया रुग्णाला पाठविणे त्याच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्याक आहे असे प्रधिकृत अधिका–यास वाटले तर त्याबाबतीत तो जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या लेखी पूर्व मान्यतेने जवळच्या अशासकिय रुग्णालयात रुग्णाला पाठवू शकतो. त्यामुळे श्री दिलीप कडव यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांची लेखी मान्यता घेवून लाईफ लाईन हॉस्पीटल, ठाणे येथे उपचार घेतले आहे. त्यासाठी त्यांना .रु २,८७,७१७.४४ एवढा खर्च झालाआहे.

शासन निर्णय क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३ दि. १९ मार्च २००५ नुसार शासकिय कर्मचा–याना व त्यांच्या कुटूंबियांना आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम सरसकट अनुदेय ठरते. त्यामुळे श्री. दिलीप कडव याना झालेल्या वैदयकिय खर्चाच्या रु.२,८७,७१७.४४ च्या ९०टक्के रु. २,५८,९४५ इतकी रक्कम शासन निर्णयानुसार अनुज्ञेय ठरते.

त्यामुळे सदर कर्मचा–यास वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत एक विशेष बाब म्हणून मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: १६** **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे विशेष बाब म्हणुन श्री. दिलीप गणपत कडव, मजूर यांची पत्नी श्रीमती कविता दिलीप कडव यांच्या प्रसृतीसाठी झालेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

**विषय क्र. १५ :—** श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल, सफाई कामगार आरोग्य विभाग यांना अप्राधिकृत रुग्णालयाचे वैद्यकीय खर्चापोटी रु. ४०,०००/- प्रतिपुर्ती मान्य करणे.

————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १५:—** श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल, सफाई कामगार आरोग्य विभाग यांना अप्राधिकृत रुग्णालयाचे वैद्यकीय खर्चापोटी रु. ४०,०००/— प्रतिपुर्ती मान्य करणे.

**प्रस्तावना**

श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल सफाई कामगार आरोग्य विभाग यांचा मुलगा कु. केशव राजेंद्र उजैनवाल यांस बॉम्बे हॉस्पीटल येथे दिनांक २८/५/०७ ते ५/६/०७ पर्यंत मुत्रपिंड प्रतिरोपन आजारावर उपचारार्थ दाखल केले होते त्यासाठी खर्च केलेल्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती रक्कम रु. १,०३,०८४ एक लाख तिन हजार चौ—याअंशी इतकी असुन सर्व वैद्यकिय बिले जोडली आहे. श्री राजेंद्र खचेडू उजैनवाल यांनी अर्जान्वये वैद्यकिय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

"मुत्रपिंड प्रतिरोपन" शस्त्रक्रिया प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी बॉम्बे हॉस्पीटल यांना प्राधिकृत केलेले नाही. त्यामुळे मागणी केलेली वरीलप्रमाणे रक्कम शासन निर्णयानुसार अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय क्रमांक एम.एजी २००५/९/प्रक्र.१/ आरोग्य ३ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १९ मार्च २००५ अन्वये रु. ४०,००० वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती अधिकार विभाग प्रमुख (मा. आयुक्त) यांना आहे.

श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल सफाई कामगार आरोग्य विभाग यांचे वैद्यकिय प्रतीपुर्ती देयक २७/६/२००७ पासुन प्रलंबित आहे. शासन निर्णयानुसार श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल सफाई कामगार आरोग्य विभाग यांना रु ४०,०००/— मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १७** **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. राजेंद्र खचेडु उजैनवाल, सफाई कामगार आरोग्य विभाग यांना अप्राधिकृत रुग्णालयाचे विशेष बाब म्हणुन वैद्यकीय खर्चापोटी रु. ४०,०००/— प्रतिपुर्ती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>**महापालिका सचिव :—**</u> विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

यावेळी श्री. दिलीपकुमार जग्यासी, श्री. नरेंद्र दवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.

———————————————————————————————————————

**विषय क्र. १६ :—**औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटी शर्तीस अधिन
राहुन रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महापालिका
क्षेत्रासाठी लागु असलेल्या प्रचलित मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल
अंतिम करणे

———————————————————————————————————————

<u>**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**</u>मा. महापौरजी, मला वाटते की, नगररचनाकार किंवा सहा. संचालक नगररचना या दोघांपैकी जो कोणी उपस्थित असेल त्याने व्यासपीठावर येवुन हा विषय समजावुन सांगावा.

<u>**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**</u>मा. महापौरजी, कित्येक नगरसेवक नव्याने निवडून आले आहेत, आपण काय करु इच्छित आहात याची त्यांना माहिती तर दया.

<u>**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**</u>सभागृहाला पुर्ण माहिती दया.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u>उत्तर देण्यासाठी कोणता अधिकारी व्यासपीठावर येत आहे?

यावेळी श्री. दिलीपकुमार जग्यासी, श्री. नरेंद्र दवणे यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—**</u>सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौर महोदय, आयुक्त महोदय, औद्योगिक वापर बंद पडल्यास, स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटी व शर्तीस अधिन राहुन रहिवास व वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील प्रचलित मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये कलम ३७ (१) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या कलम ३७ प्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करण्यासाठी शासनाने १५४ कलमान्वये निर्देश दिलेले आहेत. निर्देश असे आहेत की, जर औद्योगिक वापर असलेली एखादी कंपनी बंद पडली तर तेथे रहिवास किंवा वाणिज्य या स्वरुपाचा वापर अनुज्ञेय करता यावा त्यासाठी प्रत्येक वेळेस विकास योजनेच्या नकाशामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे काही अटी व शर्तीस अधिन राहुन आपल्याला तेथे रहिवास किंवा वाणिज्य वापर अनुज्ञेय करता येईल आणि असे करतांना आपल्याला काही क्षेत्र शहराच्या विकासाच्या अनुषंगाने सोयी सुविधासाठी (ॲम्युनिटी) म्हणुन मिळु शकेल. त्यासाठी त्यांनी काही स्लॅब प्रस्तावित केलेत. ते स्लॅब साधारण असे आहेत, कंपनी बंद पडलेल्या २ हेक्टरपर्यंतचे जे क्षेत्र असेल ते क्षेत्र आपणांस ॲम्युनिटी क्षेत्र (सुविधा क्षेत्र) म्हणुन ५ टक्के वापरावयास मिळेल. जर फॅक्टरीचे क्षेत्र २ हेक्टर ते ५ हेक्टरपर्यंतचे असेल तर २० टक्के क्षेत्र आपल्याला ॲम्युनिटी स्पेस (सुविधा क्षेत्र) म्हणुन महापालिकेस मिळेल. आणि ५ हेक्टरपर्यंत असेल तर २५ टक्के मिळेल. अशा प्रकारे फेरबदल करण्यासाठी शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर आपण कलम ३७ प्रमाणे सुरुवातीचे प्रारुप नोटिफिकेशन प्रसिध्द केले, लोकांच्या सूचना व हरकती मागविल्यात त्यावर आपल्याला तीन सूचना व हरकती प्राप्त झाल्या.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**सन्माननिय महापौरजी, सहा. संचालक, नगररचना हे काय बोलतात हे सभागृहाला काहीच माहित पडत नाही. मला तरी असे वाटते की यांना दूसरी संधी दिली जावी, पुढील वेळेस यांना सर्व तयारी करुन आणि आवाज मोठा करुन यायला सांगा. सभागृहाच्या प्रत्येक सदस्याला विचारा सहा. संचालक नगररचना हे काय बोलले ते त्यांना सांगता येते का? हे काय चालले आहे? श्री. म्हसाळ साहेब, एवढे सेवाजेष्ठ आहेत, त्यांचाही आवाज येथपर्यंत निट ऐकु येत नाही. अहो, झाले काय तुम्हा अधिका–यांना?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः–**तांत्रिक बाबीमध्ये तुम्हांला काही अडचण असेल तर सांगा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**मोठयाने बोला ना तुम्ही? जेणेकरुन आम्हां सर्वांना माहित पडले पाहिजे. आमच्या महापालिकेचे सहा. संचालक, नगररचना हे काय बोलले ते आम्हांला कळले पाहिजे.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः–**तुम्हांला सांगितलेल्या तांत्रिक बाबीमध्ये शंका असतील तर तुम्ही विचारु शकता.

यावेळी सदस्य श्री. सुनिल सुर्वे, श्री. अंकुश म्हस्के, श्री. गणपत एडके हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**तांत्रिक बाबी असु दया की दुस–या असु दया. विषयासंदर्भात सदस्यांना माहिती पडु दया ना? जसा ४ थीचा विदयार्थी पुस्तक वाचतो तसे तुम्ही वाचत आहात. हे काय चालले आहे? बोला बोला मोठयाने बोला.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः–**कलम ३७ ची कार्यवाही आपण चालु केली आहे, त्याप्रमाणे प्रारुप नोटिफिकेशन आपण प्रसिध्द केले. प्रारुप नोटिफिकेशनप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये, शासनाच्या गॅझेटमध्ये प्रसिध्द केल्यानंतर सूचना व हरकती मागविल्या त्यावर तीन नागरिकांच्या सूचना व हरकती आपणाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यांना आपण सुनावणी दिली. सुनावणीमध्ये त्यात योग्य आढळुन न आल्यामुळे आपण त्या फेटाळलेल्या आहेत आणि आता अंतिम नोटिफिकेशन काढण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करायचा आहे, त्यासाठी महासभेपुढे आपण हा प्रस्ताव सादर केलेला आहे. महासभेची मंजुरी मिळाल्यानंतर हे आपण शासनाच्या मंजुरीला पाठवुन आणि शासनाने मंजुरी दिल्यानंतर हा फेरबदल अंमलात येईल.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**सन्माननिय महापौरजी, मी सहा. संचालक नगररचना यांच्याकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की, किरकोळ दुरुस्तीचा हा जो प्रस्ताव आपण सभागृहापुढे आणलेला आहे, काय हा प्रस्ताव पुर्ण शहरात लागु होईल?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः–**पुर्ण शहरासाठी आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे जे क्षेत्र आहे त्या संपुर्ण क्षेत्रासाठी हा प्रस्ताव लागु राहिल.

यावेळी सदस्य श्री. सुनिल सुर्वे, श्री. राजेश वानखेडे, श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**यामध्ये आपण आजारी कंपन्या घ्याल की, बंद असलेल्या कंपन्या घ्याल?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः–**बंद असलेल्या कंपन्यांबाबत हा प्रस्ताव आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**बंद असलेल्या कंपन्याच घ्याल?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः–**होय.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:—**बंद कंपन्यांची व्याख्या काय आहे?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—**आता ज्या कंपन्या बंद पडायला आलेल्या आहेत, किंवा एखादी कंपनी स्वत:हुन पुढे आली की आम्हांला ही कंपनी बंद करायची आहे, असा जर त्यांनी प्रस्ताव दिला आणि त्याविषयी कामगार आयुक्तांकडुन आपणांस प्रमाणपत्र घ्यावे लागेल. त्यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपणांस परवानगी देता येईल.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**किती कालावधीपासुन ती कंपनी बंद असली पाहिजे असे काही आहे? आज माझी एखादी कंपनी चालु आहे. आपला हा ठराव पारीत झाल्यानंतर दोन महिन्यातच मी माझी कंपनी आजारी असल्याचे मी घोषित करतो व तात्काळ मी म्हणेन की मला या क्षेत्राचे रहिवाशी क्षेत्रात रुपांतर करायचे आहे.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—**तर त्यासाठी सक्षम प्राधिकारी कामगार आयुक्त हे आहेत. ते या सर्व बाबींची चौकशी करतील. व प्रमाणपत्र जारी करतील.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**म्हणजे हा जो ठराव आपण करणार आहोत तो फक्त बंद असलेल्या कंपन्याबाबत पारीत होईल?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—**जी कोणतीही कंपनी आपल्या विकास आराखडयामध्ये औद्योगिक क्षेत्र म्हणुन दाखविण्यात आलेली आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**यामध्ये आपली जी जिल्हा नियोजन समिती आहे, किंवा आणखी जे काही प्राधिकरण आहेत, त्यांची आपण संमती घेतली आहे का? कोणत्याही शहराचा जर विकास आराखडा तयार केला जात असेल तर त्यामध्ये आपण सांगितल्याप्रमाणे काही भाग रहिवासी असतो, काही औद्यागिक वापरासाठी असतो, काही भाग हरीत पट्ट्याचा असतो, काही भाग शाळांसाठी आरक्षित असतो, काही भाग कंपन्यासाठी आरक्षित असतो, अशा प्रकारे एक नियोजन केले जाते, त्याला आपण विकास आराखडा असे म्हणतो. या सदंर्भात आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडुन आपण अभिप्राय घेतला आहे का? अहवाल घेतला आहे का?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—** या प्रकरणी शासनाने आपणांस निर्देश दिले आहेत. हे बदल आपण स्वत:हुन प्रस्तावित केलेले नाहीत. हे बदल करण्यासाठी आपणांस शासनाच्या नगरविकास विभागाने आदेश दिले आहेत.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** त्यांनी आपणास निर्देश दिले आहेत की, आपणांस जर अशा प्रकारचे बदल पाहिजे असतील तर, आपण सभागृहाचा ठराव पारित करुन दया. त्यानी आपणांस आदेश दिलेले नाहीत, आदेश दिले आहेत का?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—** निर्देश आहेत त्यास आपण आदेशही म्हणु शकतो.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** निर्देश, आदेश अशा दोन्ही शब्दाचा वापर करु नका, आपण स्पष्ट करा. त्यानी जर आदेश दिले असतील तर यावर चर्चा करण्यात काय अर्थ आहे. मग आपण सूचना हरकती का मागविता?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालक:—** हे निर्देश आहेत.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** निर्देश व आदेश यामध्ये फरक आहे. आपली जी नियोजन समिती असेल, किंवा आपली जे वरिष्ठ प्राधिकारी असतील, त्यांच्याशी याबाबत आपण विचार विनिमय केला आहे का? उदाहरणा दाखल आपण सांगु इच्छितो, की आपला जो विकास आराखडा आहे, त्यातील

२५ टक्के भाग आपण औद्योगित क्षेत्र म्हणुन ठेवला आहे. बंद कारखान्या संदर्भातील हा ठराव झाल्यानंतर आपल्या शहरामध्ये १० ते १५ टक्के आणखी औद्योगिक क्षेत्र वाढते. किंवा कारखाने बंद होतात, तर त्याचा त्या कारखान्यामध्ये काम करणाऱ्या लोकांवर काय परिणाम होईल? याबाबतीत आपण काही विचार केला आहे का?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** बंद असणाऱ्या कारखान्याबाबत आपण विचार करणार आहोत. चालु असलेल्या कारखान्याबाबतीत असा विचार होणार नाही ना.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** कोणत्या?

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** जी कंपनी चागंल्या प्रकारे चालु आहे, जी बंद करु इच्छित नाही त्यांना हा ठराव लागु होणार नाही.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** असे होवु शकत नाही का? ही कंपनी बंद आहे ती आपण पुन्हा चालु करु शकु.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** ते करु शकतात.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** हे सुध्दा करु शकतात.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** महानगरपालिका त्यांना बधंनकारक करणार नाही, ती कंपनी बंद करा म्हणुन. परंतु त्यांची जर इच्छा असेल तर ते स्वतःहुन याबाबतीत पुढे येत असतील तरच हे सर्व होईल.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** याचाच अर्थ हे निश्चित आहे की, बंद असलेल्या कंपनीसच हा ठराव लागु होईल.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** बंद असलेली कंपनी,

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** मा. महापौरजी, आपण सभागृहाला स्पष्ट करा, आजारी असलेल्या कंपनीस की बंद पडलेल्या कंपनीस.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** स्थलांतरित कंपन्यासाठी सुध्दा त्यांनी तरतुद केलेली आहे. माझी कंपनी चालु असताना सुध्दा मी ती बंद स्थितीत दाखवुन स्थलांतरित करणार, जागेचे दर कमी असणाऱ्या ग्रामिण भागात जाणार, त्यामुळे येथील कंपनी बंद होणार.

**सदस्य श्री. राजेश वधारियाः—** श्री भालेरावजी अगोदर त्याचे बोलणे पुर्ण होवु दया, नंतर आपण बोला. ते विरोधी पक्ष नेता आहेत, वरिष्ठ नगरसेवक आहेत त्यांना बोलु दया नंतर आपण बोला.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** सभागृहासाठी मी माहिती घेत आहे. साहेब मी पुन्हा आपणास विंनती करतो, आजारी असलेली कंपनी की बंद असलेली कंपनी? कृपया आपण आजारी असलेल्या कंपनीची व्याख्या सांगा.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** त्यांनी लिहिले आहे की इन रिसपेक्ट ऑफ क्लोज इंडस्ट्रीशल नॉट बी परमिटेड.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** त्यात त्यांनी लिहिले आहे तो वेगळा मुदद्दा आहे. आज या महानगरपालिकेत आम्ही कोणत्या प्रकारचा ठराव पारित करणार आहोत. आपण जी टिप्पणी सादर केली आहे, तिच्यावर आपण सही केली आहे ना? तिच्यावर आपण काय लिहिले आहे ते आपण मला सांगा.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** शासन निर्देशामध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाने राज्यातील अनेक महानगरपालिकांच्या तसेच अनेक शहरांच्या विकास नियंत्रण नियमावलीत, विकास योजनेतील औद्योगिक विभागातील विद्यमान वापरबंद पडल्यास / स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटींच्या अधीन राहुन रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद समाविष्ट करुन निर्णय घेऊन तसे फेरबदल मंजूर केलेले आहेत. या धर्तीवर उक्त तरतुदर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नसल्याने, नागरी क्षेत्र औद्योगिक वापर कमी करण्याच्या शासनाच्या धोरणानुसार उक्त तरतुद उल्हासनगर महानगरपालिकांच्य प्रचलितविकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेसाठी शासनाने क्र. टिपीएस—१२१०/१४२०/प्र. क्र.३३०/१०/नवि—१२ दि. ०९ संप्टेबर २०११ अन्वये निर्देश दिलेले असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करण्याचे निर्देशित केले आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** हे आपण आता वाचुन दाखविले, ते आपणांस समजले ते आता सभागृहास समजावुन सांगा. आजारी असलेली कंपनी कि बंद कंपनी.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः—** सचिव साहेब, कृपया आपण आम्हांस समजावुन सांगा. सद्या तर आम्हांस काही समजत नाही. क्रित्येक वर्षापासून सचिव साहेब आम्हांला समजावुन सांगत आहेत. सचिव साहेब, या विषयातील काही मुदद् आपण स्पष्ट करा.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** जर दुसरा कोणी अधिकारी समजावुन सांगु शकत असेल तर सांगावे, नगररचनाकार आहेत, मा. आयुक्त साहेब आहेत. जर आपण समजावु इच्छित असाल तर समजावुन सांगा.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** विद्यमान वापर बंद पडल्यास अगर स्थलांतरित झाल्यास असे आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** याचाच अर्थ असा आहे की, अगोदर आपण म्हणत होतात की, केवळ आजारी असलेली कंपनी, असे नाही.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** आजारी असलेली कंपनी असे मी बोललोच नाही.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** साहेब आत्ताच आपण सांगितले, आजारी असलेली कंपनी, त्यानुसार तर मी आजारी कंपनी असलेल्या कंपनीची व्याख्या विचारली.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** मी पहिल्यापासूनच सांगत आहे, की आजारी असलेली कंपनी असा शब्दच येथे नाही. बंद असलेली कंपनी.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** चला ठिक आहे, आता आपण स्पष्ट करुन सांगा. आता काय बोलु इच्छिता पुन्हा एकदा सांगा. आरामात सांगा, थोडीफार वेळ घ्या, काही घाई नाही.

**श्री. पी. आर. ठाकुर, सहा. संचालकः—** शासन निर्देशनामध्ये जे लिहिले आहे.......

**सदस्य श्री. बी.बी. मोरेः—** मा. महापौरजी, उपमहापौर व आयुक्त साहेब, सन्मा. विरोधी पक्ष नेते, जी हरकत घेत आहेत, त्याचे उत्तर देण्यामध्ये आपले अधिकारी जर एवढे अडकत असतील तर त्याबाबतीत मी असे सांगु इच्छितो की, हाच विषय आपण सभागृहापुढे आणला आहे, तो सभासुचनेवर आणण्या अगोदर महापालिकेतील गटनेत्याबरोबर चर्चा करावयास पाहिजे होती. तसे न करता आपण थेट हा विषय सभासूचनेवर आणला. अधिकाऱ्यांना हा विषय ना समजवता येत, ना तो आम्ही समजु शकत. हे बरोबर नाही. अहो सहा. सचालक, नगररचनाकार हा विषय चांगला समजावुन घ्या, अभ्यास करुन या, त्यानंतरच पुढील महासभेत हा विषय आणा. आता या विषयावर चर्चा पुरे झाली.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—** सन्मा. महापौरजी, आपण म्हणत होतात की, उपमहापौर या विषयावर काही बोलु इच्छितात. आपण बोलत असाल तर तरी चालेल. माझे म्हणणे काय आहे, सभागृहाला या विषयाची पुर्ण माहिती असली पाहिजे. हा आपल्या शहराशी संबंधीत विषय आहे व कंपन्याशी संबंधीत विषय आहे. तर सर्व लोकप्रतिनिधींना याची माहिती असली पहिजे की, सभागृहात आपण कोणता विषय पारित करत आहोत. आम्ही या विषयास विरोध करत आहोत असे मला म्हणायचे नाही परंतु पुर्ण माहिती तर असली पहिजे. आजारी कंपनी आहे, बंद कंपनी आहे त्यांच्यावर या ठरावाचा काय प्रभाव पडेल? या सर्व मुदद्यांवर आपण विचार केला पाहिजे. व आमची सुध्दा जबाबदारी आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**मा. महापौरजी, औद्योगिक क्षेत्राचे रहिवासी क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्याचा हा जो प्रस्ताव तुम्ही सभागृहापुढे आणला आहे, उल्हासनगरच्या विकासासाठी तुम्हांला याची एवढी काय आवश्यकता होती? बंद असलेल्या कंपनीधारकाने तुमच्याकडे याविषयी कोणती मागणी केलेली नाही, हा ठराव आणण्यासाठी. तरी तुम्ही ठराव आणता? कुठल्याही कंपनीच्या मालकाने तुमच्याकडे अर्ज केलेला नसतांना औद्योगिक क्षेत्राचे रहिवाशी क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्याचा प्रस्ताव तुम्ही येथे आणला? या उल्हासनगरमध्ये जवळजवळ ४० ते ४५ टक्के झोपडपट्टी ग्रिन झोनवर आहेत. हा हरितपट्टा हटवुन त्याचे रहिवाशी क्षेत्रामध्ये रुपांतर करावे असे तुम्हांला वाटले नाही काय? आमच्यातील जवळ जवळ ४० टक्के नगरसेवक झोपडपट्टी विभागातुन निवडून येतात, त्यामुळे तुम्हांला अशी इच्छा का प्रकट झाली नाही की या विषयीचा प्रस्ताव आणावा म्हणुन? जर हरितपट्टयांवर असलेल्या झोपडपट्टयांचे क्षेत्र रहिवाशी क्षेत्रामध्ये आणण्याबाबतीत जर तुम्ही पुढील महासभेत प्रस्ताव आणणार असाल तर सदरच्या प्रस्तावास आमचा पाठिंबा असेल. पुढच्या येणा—या महासभेमध्ये म्हणजे ती १० दिवसांनी येणारी असो अगर एक महिन्यांनी येणारी असो त्यासभेत याबाबतचा प्रस्ताव तुम्ही आणावा अशी सभागृहाला मी विनंती करतो.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज काय माईक खराब आहे की आवाज खराब आहे हेच कळत नाही. हा ३७ (१) अंतर्गतचा जो ठराव आहे, तो उल्हासनगर महापालिकेने स्वत:हुन पाठविलेला नाही. एका किरकोळ दुरुस्तीसाठी शासनाकडे ते पाठविले होते. शासनाने संचालक नगररचना, उप—संचालक नगररचना, सहा. संचालक, नगररचना, नगररचनाकार या सर्वांच्या अहवालाच्या आधारावर औद्योगिक क्षेत्रामध्ये किती जागा आहे, महानगरपालिकेमध्ये लोकसंख्येची घनता जास्त असल्यामुळे ती ठराविक प्रकारची सुधारणा न करता महापालिकेच्या क्षेत्रामध्ये जेवढे औद्योगिक क्षेत्र आहे, त्या सर्वांवर सुधारणा आणण्याचा शासनाने ३७ (१) अन्वये निर्देश दिले आहेत. त्यावर कार्यवाही करुन शासनाला कळविणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. दुसरे असे की, सिक इंडस्ट्रीज, ग्रोथ इंडस्ट्रीज हे आपण ठरवायचे नाही. एखादयाने जर परवानगी दिली तर त्याच्यात १० ना हरकती आपण मागवितो. कामगार आयुक्त आहेत, आणि त्याच्या आधारावर रहिवाशी क्षेत्रामध्ये परवानगी घ्यायची आहे आणि यासंबंधी सर्व अधिकार आयुक्तांवर आहेत. तिसरे असे की ही जी कार्यवाही आहे ती स्वत:हुन केलेली सोमोटो नाही हे लक्षात ठेवा. शासनाने जे निर्देश दिले आहेत त्याची पुर्तता करणे ही मुंबई प्रांतिक अधिनियमानुसार आपणांस आवश्यक आहे. अन्यथा शासन आपणांस कारण नसतांना त्रास देईल. आणखी काय आहे आपला प्रश्न?

**सदस्य श्री. राजेश वधारिया:—**मा. महापौरजी, मी हे विचारु इच्छितो की, यामध्ये फक्त आजारी कंपन्या, बंद कंपन्या आणि स्थालांतरीत झालेल्या कंपन्या यांचाच प्रस्ताव आहे काय? काय आय झोनचा कोणताही भुखंड ज्यावर आजपर्यंत कोणतीही कंपनी उभारली नाही, तयार झाली नाही त्यास आय झोनमधुन आर झोनमध्ये किंवा आय झोनमधुन सी झोनमध्ये परावर्तीत केले जावु शकते काय?

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—**औद्योगिक क्षेत्रामध्ये जर एखादा भुखंड मोकळा असेल आणि त्यांनी परवानगी मागितली तर या नॉर्मर्स नुसार त्यास रहिवाशी क्षेत्रासाठी परवानगी दयायची आहे.

**सदस्य श्री. राजेश वधारिया:—**नाही.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—**यामध्ये आजारी कंपनी नाही. स्थलांतरीत कंपनीत जर एखादा भुखंड मोकळा आहे, तर संपुर्ण औद्योगिक जे क्षेत्र आहे, त्यामध्ये या नॉर्मनुसार परवानगी देवु शकतो.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>**तर आमची सूचना ही आहे की, यामध्ये काय होईल, संपुर्ण औद्योगिक क्षेत्रावर याचा परिणाम होईल. जे औद्योगिक क्षेत्र म्हणुन ठेवण्यात आले आहे आणि त्यावर आजपर्यंत कंपन्या उभारलेल्या नाहीत, त्याअगोदरच त्या क्षेत्राचे रहिवाशी क्षेत्रामध्ये किंवा वाणिज्य क्षेत्रामध्ये परिवर्तन करणे चुकीचे होईल. कारण की, त्यामुळे आमच्या शहरातील उदयोगधंदे बाहेर जातील, उदयोगधंदयांना येथे प्रोत्साहन मिळणार नाही.

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**एक गोष्ट माझ्या लक्षात येत नाही की, यामुद्दयावर ही जी चर्चा चालु आहे, ३७ (१) बाबत मागील दोन—तीन महिन्यापासुन आपण चर्चा केली आहे, त्यावर सर्व कार्यवाही झाली आहे, ९० दिवसाच्या आत आपणास शासनाला अहवाल पाठवायचा आहे. तर आता ही चर्चा करण्यात काय फायदा आहे?

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>**आपणांस जर आमच्याबरोबर चर्चा करण्याची आवश्यकता नाही तर महासभेपुढे हा प्रस्ताव आणण्यात अर्थ काय आहे? आपण स्वत:हुन (सोमोटो) करु शकत होतात ना?

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**जी कार्यवाही केली आहे, ती आपणासमोर आणली आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>**जर आपणाकडे अधिकार आहेत तर आपण आयुक्तांच्या सहीने पत्र पाठवु शकत होतात ना? महासभेपुढे प्रस्ताव आणण्याची जरुरत काय आहे?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**हा जो विषय तो यापुर्वीच सभागृहाने मंजुर केलेला आहे. कारण शासनाने दिलेल्या निर्देशानुसार हा प्रस्ताव महासभेपुढे आणलेला आहे. ते प्रशासनाचे काम होते. त्यावेळेस त्यांनी नमुद केले होते की, हे बंधनकारक आहे. शासनाने निर्देश फक्त उल्हासनगर महापालिकेला दिलेले नाहीत तर महाराष्ट्रातील सर्व महापालिकांना दिलेले आहेत. त्यानुसार ठाण्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचे रहिवाशी क्षेत्रात रुपांतर होते, कल्याणमध्ये औद्योगिक क्षेत्राचे रहिवाशी क्षेत्रात रुपांतर होते, अंबरनाथ, बदलापुर सारख्या एमएमआरडीच्या क्षेत्रामध्ये ज्या नगरपालिका आहेत त्यांच्या क्षेत्रात औद्योगिक क्षेत्राचे रहिवाशी क्षेत्रात रुपांतर होते, तर उल्हासनगरमध्ये का होवु शकत नाही? मग काही अटी आणि शर्ती या महानगरपालिकेने ठेवल्या पाहिजेत. त्या सहा. संचालक, नगरररचना यांनी यापुर्वी नमुद केल्या, की ज्या सोयीसुविधा दयायच्या आहेत, अमुक एवढे क्षेत्र असेल तर त्यांच्या सुखसोयी किती हे नमुद करणे गरजेचे आहे. त्या अटी, शर्ती महासभेसमोर आल्या पाहिजेत. या विषयावर मागच्या वेळेस सुध्दा चर्चा झालेली आहे. आता आपल्या श्री. होगेपाटील साहेबांनी सांगितले की या विषयावर मागच्या वेळेस चर्चा झालेली आहे. म्हणुन फक्त ते बोलले त्यांचा हेतु काय चुकीचा नव्हता. परंतु जर ठाण्यामध्ये, कल्याणमध्ये आहे तर उल्हाससनगरमध्ये का नको? म्हणुन आम्ही सर्वांनी त्यास मान्यता दिली आहे, मंजुरी दिलेली आहे. आमच्या श्री. भगवान भालेराव यांनी नमुद केले आहे की शासनाने निर्देश दिले म्हणुन तुम्ही महासभेसमोर आणले असे न होता, या उल्हासनगरमधील नागरीकांच्या सुध्दा काही भावना आहेत, झोपडपट्टयांमध्ये राहणारे लोक आरक्षित भुखंडावर, आरक्षित भुखंडावर असे किती दिवस चालणार? आपला विकास आराखडा ३८ वर्षापुर्वी मंजुर झालेला आहे? नविन विकास आराखडा मंजुर होत नाही यासाठी आम्ही पुढाकार घेतला पाहिजे, त्या झोपडपट्टया सुरक्षित तर आहेत परंतु त्या नियमित कश्या होतील? यासाठी प्रशासनाने प्रस्ताव दिला पाहिजे, आता हा प्रस्ताव महासभेपुढे आहे, तो मंजुर तर होईलच. पण या प्रस्तावाच्या धर्तीवरच, महानगरपालिका क्षेत्रातील ज्या झोपडपट्टया आहेत, त्यांचे आरक्षण हटविण्याचा प्रस्ताव महासभेपुढे आणा, पुढच्या महासभेपुढे आणा आणि मग शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन किंवा शासनाकडे मंजुरीला पाठवा. अशी या प्रस्तावाबरोबर आम्ही उपसूचना देतो. पुढच्या महासभेत आपण झोपडपट्टयांचे आरक्षण हटवुन त्यांना कायम स्वरुपी करण्यासाठी, झोपडपट्टीधारकांना त्यांच्या मालकीचे घर होण्यासाठीचा प्रस्ताव या पुढच्या महासभेपुढे यावा, ही श्री. भालेराव यांची सूचना आहे.

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**यामध्ये आणखी एक बाब आपल्या निदर्शनास आणतो की, सहा. संचालक नगररचना हे नगररचना अधिकारी आहेत, ते आपला नविन विकास आराखडा तयार करत आहेत, आपण जर सांगत आहात की एखादया झोपडपट्टीवर आरक्षण आहे तर तो भाग..........

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**एखादा नाही, शासनाचा निर्णय आहे की, १९९५ पुर्वीच्या किंवा आता उल्हासनगरमध्ये २००५ पुर्वीची बांधकामे नियमित केली जात आहेत.

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**त्यावेळेस ते आरक्षण यामधुन हटवुन टाकावे लागेल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**त्यावेळेस नाही, सरसकट आरक्षण हटविण्याचा प्रस्ताव तुम्ही महासभेपुढे आणा. अनधिकृत बांधकाम नियमाधिन करण्याची कार्यवाही फार मोठी आहे.

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**होय, सरसकट तो प्रस्ताव आपल्या नविन विकास आराखडयामध्ये विकास आराखडा पुर्ण करण्यात जास्त वेळ लागणार नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**तर पुढच्या महासभेपुढे आणा.

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**ठिक आहे, झाले आता समाधान?

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**एखादयाचे विशेष प्रकरण असेल तर हे स्वत: वर घेवुन जातात.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**तर शहरांच्या लोकांच्याबाबतीत काही विचार करा. शहरातील लोकांसाठी काही करा. एवढे मोठ मोठे साहेब लोक आले आहेत, शहराच्या सेवेसाठी.

**<u>उप—महापौर:—</u>**या विषयावर चर्चा बरीच झाली आहे, सचिव साहेब कृपया पुढील विषय पुकारा.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**हा विषय सर्व संमतीने पास?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६:—** औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटी शर्तीस अधिन राहुन रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी लागु असलेल्या प्रचलित मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल अंतिम करणे

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ उल्हासनगर शहरासाठीची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/१२७२/६०१८५ आर. पी. सी. दिनांक २०/०५/१९७४ नुसार मंजुर झालेली असुन दिनांक १ जुर्ले १९७४ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेली उल्हासनगर शहराची सुधारीत प्रारूप विकास योजना ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये सन २००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापी शासनाचे नगर विकास विभागाने आधिसूचना क्र. टिपीएस—१२०२/८०६/सीआर—२००२/युडी—१२ दि. २६/०१/२००४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र हे उल्हासनगर, अंबरनाथ कुळगांव—बदलापूर आणि परिसर अधिसूचिम क्षेत्र यामधुन वगळलेले असुन, उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करून सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत आदेश दिलेले आहेत व त्याप्रमाणे सदरची

विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यत मुळ मंजुर विकास योजना व प्रारूप सुधारीत विकास योजना यातीत कठोरत्तम तरतुदी लागू राहतील असेही नमुद केलेले आहे.

शासन निर्देशामध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाने राज्यातील अनेक महानगरपालिकांच्या तसेच अनेक शहरांच्या विकास नियंत्रण नियमावलीत, विकास योजनेतील औद्योगिक विभागातील विद्यमान वापरबंद पडल्यास / स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटींच्या अधीन राहुन रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद समाविष्ट करुन निर्णय घेऊन तसे फेरबदल मंजूर केलेले आहेत. या धर्तीवर उक्त तरतुदर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नसल्याने, नागरी क्षेत्र औद्योगिक वापर कमी करण्याच्या शासनाच्या धोरणानुसार उक्त तरतुद उल्हासनगर महानगरपालिकांच्य प्रचलितविकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेसाठी शासनाने क्र. टिपीएस–१२१०/१४२०/प्र. क्र.३३०/१०/नवि–१२ दि. ०९ संप्टेबर २०११ अन्वये निर्देश दिलेले असून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करण्याचे निर्देशित केले आहे.

**<u>निर्देश</u>**

१. उक्त नियोजन प्राधिकरणाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या लागू असलेल्या प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये औद्योगिक विभागातील विद्यमान औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास अशा क्षेत्रावर सोबत जोडलेल्या Appendix मध्ये नमुद अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद समाविष्ट करणेबाबत, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करावी.

२. उक्त नियोजन प्राधिकरणाने या निर्देशाच्या दिनांकापासून ९० दिवसांत जनतेकडून सुचना/हरकती मागविण्यासाठी विहित नोटीस प्रसिध्द करावी.

३. उक्त नियोजन प्राधिकरणाने, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन उक्त फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करावा.

# <u>APPENDIX</u>

## <u>Conversion of Industrial Zone into Residential Zone</u>

a) With the previous approval of Commissioner and on such conditions as deemed appropriate by him, the existing or newly builtup area of unit in the Industrial Zone may be permitted to be utilized for office or commercial purpose.

b) With the previous approval of the Commissioner any open land or Industrial land in the Industrial zone may be permitted to be utilized for any of the permissible users in the Residential Zone (R-1 Zone) or the Residential Zone with shop line (R-2) Zone subject to the following :-

i) The conversion of Industrial Zone to Residential / Commercial Zone in respect of closed industries shall not be permitted unless NOC from Labour Commissioner, Maharashtra State, Mumbai stating that all legal dues have been paid to the workers or satisfactory arrangement between management and workers have been made, is obtained. Provided that thwer conversion has been permitted on the basis of this certificate, occupation certificate will not be given unless a no dues certificate is granted by Labour Commissioner.

ii) The layout or sub division of such land admeasuring upto 2.00 Ha. shall be approved by the Commissioner, who will ensure that 5% land for public utilities and amenities like electric sub-station, bus-station, sub-post office, police out post and such other amenities, as may be considered necessary, will be provided therein.

iii) In such layouts or sub-divisions having area more than 2 ha. but less than 5 ha., 20% land for public utilities and amenities like electric sub-station, bus-station, sub-post office, police out post, garden, playground, school, dispensary and such other amenities shall be provided. Provided that at least 50% of this land shall be reserved for unbuildable reservations such as Garden, Recreational ground etc.

iv) In such layouts or sub-division each more than 5 ha. In area, 25% of land for public utilities and amenities like electric sub-station, bus-station, sub-post

office, police out post, garden, playground, school, dispensary and such other amenities shall be provided. Provided that at least 50% of this land shall be reserved for unbuildable reservations such as Garden, Recreational ground etc.

v) The areas mentioned in ii, iii & iv above will be in addition to the recreational space as required to be provided under these regulations.

vi) The required segregating distance as prescribed under these regulations shall be provided within such land intended to be used for residential or commercial purpose.

vii) Such residential or local commercial development shall be allowed within the permissible FSI of the nearby residential or commercial zone.

viii) The amenity space to be provided as per the ii, iii & iv above is deemed to be Development Plan reservations & FSI of the same shall be available for utilization on remaining land if handed over free of cost and free of encumbrance after leveling and with compound wall to the Municipal Corporation or Municipal Corporation may acquire the land subject to payment compensation.

Note :-

1. Conversion from industrial zone to residential / commercial zone shall be applicable to the entire land holding and layout shall be approved for the entire land holding and not in part.

2. The Existing reservation of Development Plan, if any (within the percentage mentioned above, for public amenities and utilities) will be extinguished and they will be convered in new regulation.

3. The Provision of Sec. 49 or 127 as the case may be shall be applicable to such amenity spaces which are deemed as D.P. reservation for the purpose of their acquisition, compensation & deemed deletion due to inaction.

4. Out of the total floor area proposed to be utilized for residential development, 20% of the same shall be built for residential tenements having built up area upto 50 Sq. mt.

शासनाने उक्त निर्देशाचे अनुंषगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने सदर फेरबदलाबाबत ठराव क्र. ५७ दि. २१/११/२०११ रोजी पारीत केलेला असून सदर ठरावानुसार लोकांच्या हरकती व सुचना मागविणेसाठी दि. १५/१२/२०११ रोजी दै. धनुष्यधारी व दै. अमृत कलश या दोन वृत्तपत्रात सदर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच सदर सुचना शासन राजपत्रामध्ये दि. २२ ते २८ डिसेंबर २०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे नागरीकाच्या हरकती/सूचना प्राप्त झालेल्या होत्या.

<u>हरकतदारांचे/सुचनाधारकांचे नांव.</u>

१. श्री. मंगेश दत्तात्रय भोसले.
२. श्री. जी. के. चव्हाण.
३. श्री. अशोक रामदास सोनावणे.

वरीलप्रमाणे प्राप्त हरकतदार/सूचनाधारकांचे हरकती/सूचनाबाबत दिनांक २१/०१/२०१२ रोजी सुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या वेळेस वरीलप्रमाणे प्राप्त एकुण ३ सूचना/हरकतीमधील अ. क्र. २ व ३ मधील हरकतदार गैरहजर होते व उर्वरीत एक सुचना/हरकतीवर सुनावणीर देवून हरकतदारांचे म्हणणे संयुक्तीक नसल्यामुळे फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे सदर फेरबदलाबाबत आतापर्यतची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण झाली असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार सदर फेरबदलाबाबत अंतिम ठराव होणे आवश्यक आहे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल त्यामुळे फेरबदल करण्याची कार्यवाही करणेपुर्वी महासभेच्या मंजुरीकरिता विषयसुचीमध्ये समाविष्ट करणेस पाठवयाचा गोषवारा महासभेच्या विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> १८ <u>दिनांकः–१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती अंजली साळवे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे प्राप्त हरकती व सूचना निकाली काढून शासनाच्या मंजुरी अधिन राहून औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास लागु पडेल अशा काही अटी शर्तींवर रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी लागु असलेल्या प्रचलित मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल अंतिम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १७ :–** महापालिका निश्चित करेल त्या वेळापत्रकानुसार मालमत्ता कराची

थकबाकी प्रदान करातून सूट देण्यास मान्यता देणे.

————————————————————————————————————————————————

<u>**सदस्य श्री. मनोज सयानीः–**</u>मा. महापौरजी, मालमत्ता कराच्या थकबाकीवर १० टक्के सुट देण्याचा हा जो आपण प्रस्ताव आणलेला आहे, २०० करोड रुपयाची आपली थकबाकी आहे, तर मी संपुर्ण विरोधी पक्षांच्यावतीने अशी मागणी करतो की, १० टक्के ऐवजी २० टक्के सुट देण्यात यावी. ज्यामुळे अधिकाधिक लोक थकबाकी भरण्यासाठी पुढे येतील व महानगरपालिकेच्या तिरोजित थकबाकीची करोडो रुपयांची रक्कम जमा होईल. आणि त्यातुन शहर विकासाची कामे होवु शकतील. यासाठी १० टक्के सुट न देता २० टक्के दिली जावी.

यावेळी सदस्य श्री. राजु जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–**</u>पुर्णच्या पुर्ण थकबाकी माफ करा ना? दुसरे आहे काय? पुर्ण थकबाकी माफ करा.

<u>**सदस्य श्री. मनोज सयानीः–**</u>तसेही थकबाकीची ही २०० करोड रुपयाची रक्कम खड्डयामध्ये गेलेली आहे. आणि त्या रक्कमेतुन जर काही रक्कम येत असेल तर थोडी जादा सुट देवुन ती २० टक्के केली जावी., अशी मागणी आहे.

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–**</u>कदाचित असे वाटते की, आपलीही बरीचशी थकबाकी आहे. श्री. मनोजजी आपलीही बरीचशी बाकी आहे असे वाटते.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>**श्री. बोडारे साहेब एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो, कल्याण महानगरपालिकेने २ वर्षापुर्वी लोकांना सुट दिली होती. परंतु आपणाकडे लोकांकडुन दोन टक्के व्याज वसुल करण्यात आले आहे. त्यांना आपण सुट का देत नाहीत. जर त्यांनी व्याज भरले आहे, ज्या लोकांनी एक रक्कमी पैसे भरले आहेत, त्यातील, तर त्यांना परत दया ना तुम्ही व्याज घेणार, परंतु लोकांचा जो हक्क आहे, तो त्यांना देणार नाही. आपण जो प्रस्ताव आणला आहे, तो महापौरांनी किंवा सत्तापक्षाने आणला आहे, त्याना मी धन्यवाद देतो. परंतु लोकांचा जो हक्क आहे, जे वेळेवर पैसे भरतात तर त्यांना सुध्दा हक्क दिला जावा ना?

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, एका सन्माननिय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या येथे कुठल्याही गोष्टीवर व्याज लागते काय? महापालिका झाल्यानंतर कुठल्याही गोष्टीवर आजपर्यंत व्याज लावण्यात आला आहे? दंड आहे, व्याज नाही आहे जरा सांगा. शासनाने पारीत केला आहे आणि त्यांचेच शासन आहे.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–</u>**माझी जी भावना आहे त्यास जरा समजुन घ्या. माझी जर चुक झाली असेल तर त्याबद्दल क्षमा करा.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**पास,पास,पास...............

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>**२० टक्याची मागणी करा ना, २० टक्याची सुट दया.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**मा. महापौरजी, आमची अशी सूचना आहे की, आपला हा जो प्रस्ताव आहे तो अतिशय चांगला आहे. लोकांवर २०० करोड रुपयाची थकबाकी आहे. ती वसुल झाली पाहिजे, त्यासाठी लोकांना अशी काही योजना दिली पाहिजे, ज्यामुळे लोक थकबाकी भरण्यासाठी स्वत:हुन पुढे येतील. याचबरोबर आपण १० टक्के सुट देतो. व २४ टक्के दंड आकारतो. त्यासाठी सूचना अशी आहे की, जो कोणी व्यक्ती १० टक्के रक्कम कपात करुन ९० टक्के रक्कम भरु इच्छितो, त्यास दंडाच्या रक्कमेतही सुट मिळाली पाहिजे. जर आपण २४ टक्के दंड आकारला दोन वर्षासाठी त्यांना ४८ टक्के दंड झाला त्यामुळे १० टक्के सुट देण्यामध्ये काही अर्थ राहणार नाही. मुळ रक्कम जी आहे ती आपणांस मिळाली पाहिजे. त्यातुन १० टक्के वजा करुन जी आपण सुट देत आहात, व त्यावर दंड आकारता कामा नये. तरच आपणांस या मोहिमेत अतिशय चांगला प्रतिसाद मिळेल. अन्यथा प्रतिसाद मिळणार नाही. आणि मिळालाच तर तो अतिशय कमी मिळेल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**मा. महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, हा जो प्रस्ताव आणला आहे तो खुपच चांगला आहे, महापालिका क्षेत्रामध्ये गेल्या पाच वर्षात २० ते २५ हजार जी बांधकामे झाली आहेत त्यांच्या महापालिका कर पावत्या का काढत नाही? प्रत्येक कर पावती मागे पैसे मागितले जातात. एका दिवसात कर पावती मिळते. हजार दया, दोन हजार दया, लगेच कर पावती मिळते. आपण महसुलाचा विचार करतो त्यासाठी थकबाकीवर सुट देण्याचा प्रस्ताव आणता मग आपला कर विभाग कर पावत्या का देत नाही? आमच्या सारख्याला अजुनही कर पावती मिळालेली नाही. ॲसेसमेंटला कोण जबाबदार आहे? शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे चालली आहेत, किंवा अधिकृत बांधकामे चालली आहेत, जसा हा प्रश्न भेडसावत आहे तसेच कर विभागातील अधिका–यांचे कर्तव्य नाही का? त्यांचे फक्त वसुलीचे काम आहे काय? आयुक्त साहेब, याच्यावर कृपया खुलासा करावा, महापौर महोदया कृपया आयुक्तांना खुलासा करण्यास सांगा

**<u>श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:–</u>** सन्मा. महापौर महोदया, सन्मा. उपमहापौरजी, सन्मा. आयुक्त व सर्व सन्मा. सभागृह, आता सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याअन्वये त्यांनी जी माहिती मागितलेली आहे, त्यानी सांगितले आहे ज्या मालमत्ताना पावती दिली जाते म्हणजे त्यांचे कर निर्धारण केले जाते त्यासाठी महापालिका अधिनियमात जी तरतुद आहे त्यानुसार आम्ही कार्यवाही करतो. इमारत बाधंकामातस जर परवानगी घेतली असेल व त्याच्याकडे बाधंकाम पुर्णत्वाचा दाखला असेल त्यानुसार आम्ही त्याचे करमुल्य निर्धारण करतो. अथवा जी सबंधित व्यक्ती आहे त्या

व्यक्तीने करारनामा आणि खरेदीखत सादर केल्यानंतर त्या जागेचे करमुल्य निर्धारण केले जाते. त्याची सविस्तर माहिती सन्मा. सदस्यांना दिली जाईल.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–** श्रीमती कंठे महोदया, माझ्या विषयाला बगल न देता तुम्ही थोडक्यात उत्तर दिले तर बरे होईल. तात्रिंक मुददे् सांगु नका, आम्ही साधी माणसे आहोत, किरकोळ प्रश्न विचारला आहे. आज एवढी अनाधिकृत बाधंकामे आहेत. सगळे म्हणतात अधिकृत आहेत, मग त्यांच्या टॅक्स पावत्या बनवत का नाहीत? उत्पन्न कोणाचे वाढणार आहे? आज स्थानिक संस्था करामुळे उत्पन्नात जी घट झाली आहे, आणि पुढे पण या बाबतची अडचण येणारच आहे ना? मग आम्ही कधी सावध होणार? आम्हाला का सांगावे लागते आहे की जावुन टॅक्स पावती काढा आणि तो इन्सपेक्टर पावती काढत नाही. मी हे सर्वसाधारणपणे विचारत आहे त्याबाबतीत तुम्ही काय कार्यवाही करणार आहात? अनाधिकृत बाधंकाम विभाग पण आपलाच आहे, या महापालिकेतच आहे, आलेल्या तक्रारी पण महापालिकेच्या आहेत, ती बाधंकामे अधिकृत आहेत अनाधिकृत आहेत या भानगडीत आम्ही पडत नाहीत. आमचे म्हणणे आहे की, जर इमारत तयार आहे तर कर महापालिकेला भरला पाहिजे. माझा असा आरोप आहे की, मी स्पष्ट सांगतो की पैसे दिल्याशिवाय कर पावती भेटत नाही. तसेच या सभागृहातील सर्व नगरसेवक तुम्हाला सांगतील पैसे दिले तर एका दिवसात टॅक्स पावती दिली जाते. अन्यथा तीन तीन महिने झाल्यानंतरही टॅक्स पावती दिली जात नाही. माझा आरोप आहे या विषयाचे तुम्ही उत्तर दया. तांत्रिक माहिती देवु नका. आम्ही साधी माणसे आहोत.

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:–** मी सन्मा. सभागृहाला सांगु इच्छिते, की बाधंकाम अधिकृत असो की अनाधिकृ असो आम्ही त्यांच्याकडुन कर वसुली करतो, महानगरपालिकेला निधी हवा आहे त्यासाठी आम्ही कर वसुली करतो. कर लावला आहे त्यासाठी आम्ही मालमत्तेच्या बदद्ल काहीही प्रमाणपत्र देत नाही. दुसरा मुदद्ा जो आपण सन्मा. सभागृहापुढे उपस्थित केला की एका दिवसात जर पावती दिली जाते किंवा ३–३ महिन्यात दिली जात नाही याबाबत आपणांकडुन तक्रार प्राप्त झाल्या किंवा तसे तुम्ही निर्देशनास आणुण दिल्या नंतर, त्यांची सखोल चौकशी करुन तसा अहवाल मी सभागृहापुढे सादर करु शकेन.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–** महोदया, सखोल चौकशी नाही हा किरकोळ विषय आहे, सखोल चौकशीची गरज नाही. तुम्हाला सांगतो मला स्वत:ला फिरायला लागत, मी माझे उदाहरण सांगतो, मग त्या श्री. काजळे साहेबांना सांगा. पहिले इन्सपेक्टर बघेल मग कॉम्प्युटरला जाईल, जोपर्यंत तो कॉम्प्युटरमध्ये नोंद करणार नाही. तोपर्यंत होणार नाही. त्यानंतर तो बोलेल आज मला वेळ नाही, उद्या वेळ नाही, परवा वेळ नाही, तुम्ही काय लावले? काय? तुम्ही महापालिकेचे नुकसान करताय, तुम्ही नुकसान करताय, सार्वजनिक सोयीचे नुकसान करताय, आम्ही जे म्हणतोय त्यावर काय करताय ते सांगा. खुलासा होणार मग बघु त्याला काय करायचे ते, अर्ज आल्यानंतर तुम्ही किती दिवसात टॅक्स पावती दयाल, त्याची शाश्वती दया, आम्हाला टेक्नीकल बाबी सांगु नका. महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रश्न आहे. हा आमच्या घरचा प्रश्न नाही. किरकोळ गोष्ट विचारलेली आहे, किरकोळ गोष्टीचे किरकोळ उत्तर दया.

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:–** सन्मा. सभागृहास अगदी व्यवस्थीत उत्तर दिले आहे.

**सदस्या श्रीम. मिनाताई सोनेंजी (सोंडे):–** मा. महापौरजी, श्रीमती कंठे महोदया, आमच्या उल्हासनगर कॅम्प नंबर ४,५ मध्ये बराचसा रहिवासी विभाग आहे, तेथे आता जिन्सचे मार्केट तयार झाले आहे, त्यांना अजुनही रहिवासी वापराच्या हिशेबांने टॅक्स येत आहे, व्यवसायीक वापरानुसार टॅक्स येत नाही. यासाठी नवीन असेसमेन्ट होणे खुपच जरुरीचे आहे, कृपया याबाबीकडे लक्ष दिले जावे.

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:–** सन्मा. सभागृहास विनंती करुन सांगते, अशी तक्रार ज्यावेळेस निर्देशनास येईल, त्यावेळी तिचे तात्काळ निवारण करण्याची मी स्वत: काळजी घेईन.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–** महोदया, निर्देशनाचा हा विषय नव्हता, सभागृहाला एवढेच सांगा, अर्ज आल्यानंतर किती दिवसात तुम्ही टॅक्स पावती दयाल. मी एवढा साधा प्रश्न तुम्हांला विचारला आहे, ७ दिवसात, १५ दिवसात, कर पावती किती दिवसात दयाल तुम्ही मी एवढेच विचारत आहे.

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:—** यामध्ये १५ दिवसात अर्ज निकाली काढण्याची तरतुद आहे आणि ती निकाली काढली जाते.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**महोदया मी तुम्हांला फक्त किरकोळ साधा प्रश्न विचारला आहे तेवढेच तुम्ही उत्तर सांगा.

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:—**१५ दिवसातच त्याचा निकाल लागायला हवा आणि कर पावती तुम्हांला मिळायला हवी.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**जर १५ दिवसात कर पावती मिळाली नाही तर त्या अधिकारी/कर्मचा—यावर काय कारवाई करणार तुम्ही?

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:—**संबंधितांवर कारवाई करावी लागेल. कर निरिक्षकांना हे सर्व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**हा विषय प्रशासनाने आणला आहे त्याबद्दल धन्यवाद। कल्याण महापालिकेने अशाच प्रकारची सुट रहिवाश्यांना दिली आहे आणि त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढले, तसे उत्पन्न अगोदरच आहे त्यांचे. फक्त लोकांना याबद्दल आकर्षित करायचे आहे याबद्दल धन्यवाद। श्री. राजेश वदारिया यांनी जो प्रश्न उपस्थित केला की यापुर्वी २ टक्के दंड आकारणी केली तर तसे करतांना शासनाने तो निर्णय दिलेला आहे. शासन निर्णयाचे आम्ही उल्लंघन करु शकत नाही तुम्ही शासनाकडे जावुन हा शासन निर्णय रद्द करायला सांगा तुम्ही राज्यातील सत्ताधारी पक्षामध्ये आहात परंतु शासनाच्या निर्णयाचे पालन महानगरपालिकेने पुर्वी केलेले आहे. जर तसे केले नसते तर शासनाने यावर कारवाई केली असती. आणि ही जी सुट दिली जाते ती महापालिका सोमोटो देते. आम्ही शासनाच्या निर्णयाचे सुध्दा पालन केलेले आहे की, २ टक्के दंड लावलेला आहे. आणि आता तसे आम्हांला टाळता येत नव्हते. परंतु त्याच रहिवाश्यांना सुट देण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. आम्ही मागच्यावेळेस सांगितले आहे की, आम्ही विश्वस्त आहोत. महानगरपालिका चालली सुध्दा पाहिजे नुसती सुट देवुन चालणार नाही. त्यांना सुविधा सुध्दा दिल्या पाहिजेत. आणि म्हणुन १० टक्के सुट, तीन महिन्यानंतर ६० टक्के सुट ही वाजवी आहे. उगीचच राजकारण करुन कुणी बोलेल २० टक्के, कुणी बोलेल ५० टक्के, कुणी म्हणेन १०० टक्के, त्यामुळे महानगरपालिका चालणार नाही, महापालिका चालवायची असेल तर लोकांना दंडही दिला पाहिजे, साम, दाम, दंड, भेद सगळे हातकंड अवलंबिले पाहिजेत, कुणाला शाबासकी दिली पाहिजे तर कुणाला दंडही दिला पाहिजे त्यानुसार आपण दंड आकारणी केलेली आहे, शासनाच्या निर्णयानुसार, शासनाच्या आदेशानुसार. परंतु महापालिकेने लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी ही जी सुट दिली आहे, त्यासाठी सांगतो की हा ठराव पारीत केला जावा आणि श्री. सुनिल सुर्वे यांनी हा जो मुद्दा याठिकाणी उपस्थित केला की वारंवार आकारणी करण्यासाठी कर्मचारी येतात याउलट आकारणी ही स्वत:हुन केली पाहिजे. महानगरपालिकेचे कर्मचारी तेथे कर आकारणी करण्यासाठी गेले पाहिजे. नगररचनाकार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात समन्वय असला पाहिजे की नगररचना विभागाने एखादया कामाचे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिला की लगेच कर आकारणीसाठी अधिकारी गेले पाहिजेत. लोकांनी अर्ज सुध्दा करायला नको. तर यापुढे अशी सूचना करतो की, त्या त्या महासभेसमोर प्रत्येक महासभेच्या वेळी आलेले अर्ज हे आपले अधिकारी पुढच्या महासभेत आणतात त्यामुळे लोकांच्या तक्रारी येत असतात, ते नगरसेवकांना विचारतात, कुठलीही तक्रार कुठल्याही फिल्डची असो महासभेसमोर येता कामा नये. महासभेसमोर जर आली तर इन्स्पेक्टर जो असेल त्याच्यावर कारवाई करावी.

**महापालिका सचिव:—**पास? जश्याप्रकारे प्रशासनाचा प्रस्ताव आहे त्याप्रमाणे पास? ठिक आहे?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑ **विषय क्र. १७:—** महापालिका निश्चित करेल त्या वेळापत्रकानुसार मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करातून सूट देण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे एकुण १,६०,००० मालमत्ता अस्तित्वात असून दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर मालमत्ता करापोटी अंदाजे २०० कोटी रक्कमेची थकबाकी प्रलंबित आहे. थकबाकी रक्कम जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२—१अ मध्ये मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेली व्यक्ती किंवा व्यक्तीचा वर्ग महापालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील, अशा मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या वर्गाला, राज्य शासन मान्य करील अशी सुट देता येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

सदर तरतुद व शासन मंजुरीच्या अधिन राहून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतधारकांना मालमत्ता करापोटी प्रलंबित असलेल्या थकीत रक्कमेवर सुट देणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सुट लागु असलेला कालावधी | प्रस्तावित सुट |
|---|---|---|
| १ | दिनांक ०१ जुन २०१२ ते दिनांक ३१ ऑगस्ट २०१२<br>किंवा<br>शासन मंजुरीच्या दिनांकापासुन ३ महिने | मालमत्ता करापोटी दिनांक ३१/३/२०१२ पर्यंत प्रलंबित असलेल्या सामान्य करांचे थकबाकी रक्कमेवर सुट १० टक्के अनुज्ञेय असेल. |
| २ | दिनांक ०१ सप्टेंबर २०१२ ते दिनांक ३० नोव्हेंबर २०१२<br>किंवा<br>शासन मंजुरीच्या दिनांकापासुन प्रथम ३ महिन्याच्या कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासुन ३ महिने | मालमत्ता करापोटी दिनांक ३१/३/२०१२ पर्यंत प्रलंबित असलेल्या सामान्य करांचे थकबाकी रक्कमेवर सुट ७ टक्के अनुज्ञेय असेल. |

१) मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करण्यातून अनुज्ञेय असलेली सुट व त्याच्या कालावधीसंबंधी नागरीकांना जाहिरातीद्वारे अवगत करण्यात येईल.

२) **मालमत्ता बिलाची प्राप्त:—**मिळकतधारकांनी वर्ष २०१२—१३ करीता मालमत्ता कर बिल प्राप्त होण्याची वाट न पाहता व्यक्तीश: बिल प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. यासाठी महापालिकेमार्फत पुढील यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

१) दुरध्वनी (IVRS) No. २७०८८३०

२) मोबाईल एसएमएस

३) किऑक्स सेंटर ( Self Servcice Multi Utility Kiosk Centre)

४) नागरिक सुविधा केंद्र (Citizen Facillitaton Centre)

**महासभा ठराव क्र:** १९ **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाच्या मंजुरी अधिन राहून प्रस्तावित अटी, शर्ती व वेळापत्रक अंतिम करुन उल्हासनगर शहरात मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करणा—या मिळकतदाराला सामान्य कराचे थकबाकी रक्कमेवर लागु पडेल अशी सूट देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

➡ **विषय क्र. १८ :–** परिवहन समितीद्वारे शिफारिश केलेले भाडे निश्चित करणे.

————————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>**महानगरपालिकेने केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्राय.लिमिटेड या ठेकेदाराबरोबर २००८ मध्ये जो करार केला आहे त्यानुसार हा जो प्रस्ताव आलेला आहे दर निश्चितीबाबतचा त्यांनी जो अभिप्राय दिला आहे, जे कारण दिलेले आहे की रस्त्यांची स्थितीमुळे वाहनांच्या देखभाल दुरुस्ती खर्चामध्ये जी वाढ होत आहे व जो पगार आहे तो वाढल्यामुळे भाडे वाढीचा दर वाढविण्याची मागणी ठेकेदारांमार्फत होत आहे. परिवहन समितीने एक प्रस्ताव पारीत करुन महासभेमध्ये दिला आहे. जो प्रस्ताव परिवहन समिती सदस्यांनी पारीत करुन पाठविला आहे, कृपया त्याच वाढीव दरावर हा प्रस्ताव पारीत केला जावा. त्याचबरोबर सभागृहाचे लक्ष मी या गोष्टीकडे वेधु इच्छितो की, डिझेलचे वाढते भाव आणि कर्मचा–यांचा वाढता पगार लक्षात घेवुन ठेकेदाराला दर वाढवुन दिले पाहिजेत. दुसरीकडे करारावर सही करतांना त्यांनी ज्या अटी, शर्ती स्विकारलेल्या आहेत, त्यांचे अदयापपर्यंत त्यांनी पालन केले नाही. मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, यावेळेस माझ्या हातात केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याबरोबर केलेल्या करारनाम्याची प्रत आहे. त्यानुसार पार्किंगसाठी उल्हासनगर शहराच्या हद्दीत अंबरनाथ शिवमंदिर जवळ उल्हासनगर कॅम्प ५ येथिल कैलास कॉलनी येथे महानगरपालिकेचा एक एकर भुखंड २००८ पासुन त्यांना देण्यात आला आहे. तेव्हापासुन त्यांच्याकडुन कोणत्याही प्रकारचे भाडे किंवा किंमत वसुल करण्यात आलेली नाही. त्यास आज ४ वर्ष होत आली आहेत. ठेकेदाराने महानगरपालिकेकडे एक रुपया सुध्दा जमा केलेला नाही. काय आहे, एक एकरचा भुखंड कोणत्या शर्तीवर दिला? जर त्या अटी शर्ती पुर्ण झाल्या नाही तर त्याबद्दल काय शासन, प्रशासन कारवाई करेल? एक एकर भुखंडाची आजच्या बाजारभावानुसार किंमत केली तर ती कित्येक करोड रुपये होईल, अंदाजे २५ करोड रुपयाचा तो भुखंड शासन, प्रशासनाने ठेकेदारावर खुश होवुन राजीखुषीने दिला आहे. कृपया याबाबत स्पष्टीकरण करा. व जे भाडे अदयाप वसुल केले जात नाही त्याबाबत खुलासा करावा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>**मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, यामध्ये शासनाची भुमिका काय आहे ती सांगितली जावी. प्रशासनाची भुमिका होवु शकते. शासनाची काय आहे? प्रत्येक गोष्टीत शासन प्रशासन, शासन प्रशासन असे करत आहेत. शासनाची भुमिका काय आहे ते जरा सांगा.

यावेळी सदस्य श्री. हरेश जग्यासी, श्री. दिपक सिरवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.



**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>**सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांना मी सांगु इच्छितो की, हा प्रस्ताव जेव्हा पारीत झाला होता तेव्हा सभागृहापुढे आला होता. त्यानंतर कित्येकवेळा केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. त्यावेळेला शासनाकडुनही याकडे लक्ष दिले नाही की १ एकरचा भुखंड का दिला? याबाबत शासनाचीही जबाबदारी ठरते कारण जर कुणी एक वर्ष टॅक्स भरत नसेल तर त्यावर २४ टक्के दंड आकारला जातो. आणि यांना जो एक एकरचा भुखंड दिला तर त्याची काय किंमत असेल? व हा एक एकरचा भुखंड त्यांना का देण्यात आला आहे? याबाबत शासनाची जबाबदारी आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**शासनाची यामध्ये काय जबाबदारी आहे? आयुक्त साहेब, तुम्ही सांगा. नाहीतर या सन्माननिय सदस्यास माफी मागावी लागेल. शासनाची काय भुमिका आहे? प्रशासनाची नाही.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा राजवानी, श्रीमती जया माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुखः—</u>**मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब व सन्माननिय सर्व सदस्य, उल्हासनगर महानगरपालिकेने जी परिवहन सेवा सुरु केली, निविदेतील अटी, शर्तीनुसार जागेचे भाडे, जागा आपण त्याला दिलेली आहे, त्या जागेचे भाडे आपल्याला त्याच्याकडुन घ्यायचे आहे. आणि त्यासंदर्भात मालमत्ता विभागाकडुन बरीचशी कार्यवाही केलेली आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**साहेब, आम्ही काय विचारले आहे, शासनाची काय भुमिका आहे ती सांगा. आपण आपली (प्रशासनाची) भुमिका सांगु नका. आमच्या सन्माननिय सदस्यांनी शासन, प्रशासन दोघांनाही जोडले आहे. त्यामध्ये त्यांनी शासनवाल्यांना म्हणजे आम्हांलाही जबाबदार ठरविले आहे, तर यामध्ये शासनाची काय भुमिका आहे ते सांगावे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**सर्वप्रथम श्री. महाराज भुल्लर यांचा प्रश्न बरोबर आहे, शासनाची, आमची काय भुमिका आहे ती सांगावी. नाहीतर त्यांनी सभागृहापुढे माफी मागावी. विरोधी पक्षात असतील म्हणुन काहीही बोलतील असे चालणार नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**याबाबत त्यांना माफी मागावी लागेल.

यावेळी श्री. दिपक सिरवानी, श्री. हरेश जग्यासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**मा. महापौरजी, आमच्या अधिका—यांनी उत्तर दिले आहे की, मालमत्ता विभागाकडुन याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. व त्यांच्याकडुन काही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे याचे उत्तर मालमत्ता विभागाचे जे कुणी मुख्य अधिकारी असतील त्यांनी कृपया दयावे. त्यांनी अदयापपर्यंत का कारवाई केलेली नाही?

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**आयुक्त साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे अगोदर उत्तर दया. शासनाची भुमिका काय आहे ती स्पष्ट केली जावी.

**<u>उप—महापोर :—</u>**श्री. मनोज सयानीजी, येथे संदिग्धता आहे आपण शासनाची गोष्ट करत आहात, महाराष्ट्र शासनाची की उल्हासनगर महापालिका शासनाची?

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>**हा तर फार मोठा विनोद झाला. ठिक आहे, उप—महापौरजी, उत्तर आपले नव्हते.केवळ शब्द आपले होते. एका गंभीर मुद्दयाबाबतीत या सभागृहामध्ये एक प्रश्न उपस्थित केला आहे, ज्याचे मला उत्तर/ स्पष्टीकरण मिळत नाही, मात्र एक हास्यास्पद विनोद केला जात आहे की, महाराष्ट्र शासनाबाबत बोलत आहात की, महापालिका शासनाबाबत बोलत आहात? मी असे म्हणत आहे की या मुद्दयासाठी जबाबदार उल्हासनगर महानगरपालिकेचे शासन, प्रशासन आहे. कारण की

```
ERROR: syntaxerror
OFFENDING COMMAND: %ztokenexec_continue

STACK:

-filestream-
```